दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... ©email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२४६ | रविवार, दि.२९ डिसेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

संपादकीय

सोडणार नाही पण पकडणार कधी?

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीड जिह्यातील मस्साजोगचे सरपंच देशमुख यांच्या खुन्यांना, ते कोणीही असतील तरी सोडणार नाही अशी ठिकठिकाणी घोषणा केली आहे. मात्र मात्र तीन आठवडे उलटत आले तरी महाराष्ट्र पोलिसांना हा जो 'कोणीही' आहे तो सापडलेला नाही. सरकार विधिमंडळात जेव्हा बोलते तेव्हा त्यांचे बोल खरे करण्याची नोकरशाहीची तयारी हवी असते. पण, अधिकारी बीड जिह्याला अपवाद करत आहेत. विरोधकांचे काम सत्तापक्षाचे आमदार करत आहेत. न्याय कधी होणार हा प्रश्नच आहे. त्यात महाराष्ट्रात चिमुरड्यांवर सुरू असणारे अत्याचार डोळ्यात अश्रू उभे करत आहेत. ही स्थिती बदलली पाहिजे.

भाजप प्रदेशाध्यक्षपदी रवींद्र चव्हाण; लवकरच होणार घोषणा

मुंबई : राज्यातील मंत्रिमंडळाच्या विस्तारानंतर आता भाजपाच्या प्रदेशाध्यक्षपदाची निवड ही सर्वांच्या चर्चेचा विषय बनत चालला आहे. त्यातच भाजपच्या प्रदेशाध्यक्षपदी माजी मंत्री रवींद्र चव्हाण यांची नियुक्ती जवळपास निश्चित मानली जात आहे. परंतु, ही निवड आगामी नवीन वर्षात होणार की स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडल्यानंतर होणार हे अजूनही गुलदस्त्यात आहे. रवींद्र चव्हाण हे एकनाथ शिंदे सरकारमध्ये सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून कार्यरत होते. डोंबिवलीतून ते चौथ्यांदा विजयी झाले आहेत.

शेतकऱ्यांसाठी १०० दिवसांत आराखडा तयार करा!

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिले निर्देश

मुंबई । प्रतिनिधी

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या पुढील प्रगतीसाठी १०० दिवसांचा आराखडा तयार करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या आहेत. मुख्यमंत्री फडणवीसांनी वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांची बैठक घेतली. या बैठकीत विविध विभागाचे मुख्य सचिव उपस्थित होते. यावेळी कृषी विभागाला आपल्या आराखड्यात शेतकरी केंद्रबिंदु ठेवत योजनांची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

कोणत्याही सरकारच्या सुरुवातीचे १०० दिवस महत्त्वाचे असतात. कारण त्यातून पुढील पाच वर्षांच्या कार्यक्रमाची चुणूक दिसत असते. राज्यातील बहुतांश भागातील शेतकरी अवकाळीच्या कचाट्यात सापडला आहे. राज्यात मागील तीन दिवसांपासून ढगाळ हवामान वादळी वाऱ्यासह पाऊस आणि गारपीटीनं शेतकऱ्यांची पिकं भुईसपाट केली आहेत. झालेल्या पावसाने केळी बागा जमीनदोस्त केल्या. तर गहू, मका, हरभरा, कलिंगड, पपई आणि भाजीपाला पिकांनाही मोठा फटका बसला आहे. खानदेशात ५ हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाल्याचा ◀◀ पान २ वर

माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग अनंतात विलीन

नवी दिल्ली । वृतसंस्थत्त

अमर रहे..., अमर रहे..., मनमोहन सिंग अमर रहे...,च्या घोषणांनी जागतिक दर्जाचे अर्थतज्ज्ञ आणि देशाचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांना अखेरचा निरोप देण्यात आला. त्यांच्या पार्थिवावर दिल्लीतील ◀◀ पान २ वर

बीडमधील सर्वपक्षीय मूक मोर्चात नेत्यांचा आक्रोश

धनंजय मुंडेंना मंत्रिमंडळातून हाकला, वाल्मिक कराडला अटक करा

संतोश देशमुख यांच्या न्यायासाठी लाखोंचा जनसमुदाय रस्त्यावर

तर दंडुका हाती घ्यावी लागेल – जरांगे पाटील

मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी बोलताना कारवाई न केल्यास दंडुका हाती घ्यावा लागेल, असा इशारा दिला. जरांगे म्हणाले की, सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांना विनंती आहे की, तुम्हीच मुख्यमंत्र्यांकडे जा. सत्ताधारी आणि विरोधक दोघेही मुख्यमंत्री साहेबाकडे जाऊन बसा. जेवढी नावे तुम्ही सांगाल तेवढी अटक करा. जरांगे म्हणाले की, आमची भाषणे होऊन जातील. संतोष भैय्याच्या मुलीचे तोंड एकदा बघा. त्यांनी सांगितले की, तुमचा नेता (फडणवीस) आमचा दुष्मन नाही. आरोपी सापडणे मोठी गोष्ट नाही, आमच्या मुलांनी कमेंट केली तर अटक केली, पण खुनाचे आरोपी तुम्हाला सापडत नाहीत. संतोष दादाची हत्या झाली, परभणीत झाले, धाराशिव मध्ये असच प्रकार घडला आहे. अंबडमध्ये एका मुलीला फाशी घ्यावी लागली. काही मंत्र्यांना राज्यात विध्वंस घडवायचा असला तरी आम्ही ते होऊ देणार नाही. प्रत्येकाला अटक करा, राज्यपालांची परवानगी घ्या आणि अटक करा, राज्यपाल सुद्धा तुमचेच आहेत, असे ते म्हणाले.

बीड । प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्ये प्रकरणी शनिवारी (२८ डिसेंबर) बीडमध्ये सर्वपक्षीय मूक मोर्चा काढण्यात आला. या विराट सर्वपक्षीय मोर्चामध्ये बोलताना सर्व पक्षीय नेत्यांनी मंत्री धनंजय मुंडे यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टीची मागणी करतानाच त्यांना बीडचे पालकमंत्रीपद देऊ नये, अशी मागणी एकमुखाने करण्यात आली. बीडमधील दहशतीला मुंडे कारणीभूत असल्याचा आरोप अनेक नेत्यांनी केला. भाजप आमदार सुरेश धस यांनी मुंडे बंधू भगिनीवर जोरदार हल्लाबोल केला. मूक मोर्चाला मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील, संभाजीराजे छत्रपती, जितेंद्र आव्हाड, खासदार बजरंग सोनवणे आमदार सुरेश धस, संदीप क्षीरसागर, प्रकाश सोळंके, अभिमन्यू पवार, नरेंद्र पाटील, ज्योती मेटकर आणि दीपक केदार आणि इतरांनी संबोधित केले. संतोष देशमुख यांची कन्या वैभवीने सुद्धा मोर्चाला संबोधित केले. यावेळी वैभवीने काल ढगाआड गेलेला सूर्य आज दिसतोय, पण माझे वडिल कधीच दिसणार नाही म्हणताच मोर्चातील जनता गहिवरली.

या विराट मूक मोर्चामध्ये सर्वपक्षीय नेत्यांसह सामान्य नागरिक लाखोंच्या संख्येने सहभागी झाले होते. आम्ही न्याय मागण्यासाठी आलो ◀◀ पान २ वर

एकत्र या, माझ्या वडिलांना न्याय मिळवून द्या–वैभवी देशमुख

मोर्चाच्या शेवटी झालेल्या सभेमध्ये मयत सरपंच संतोष देशमुख यांची मुलगी वैभवी देशमुख हिने अत्यंत भावनाविवश होत भाषण केले. माझे वडील आता मातीच्या आड गेले आहेत, मला आता ते कधीच भेटणार नाहीत. त्यांना न्याय मिळाला पाहिजे . त्यांच्या न्यायासाठी सगळे एकत्र या, मला तुमची गरज आहे. माझ्या कुटुंबासोबत राहा आणि न्याय मिळवून द्या असे भावनिक आवाहन यावेळी वैभविने केले.

तोपर्यंत धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्या – आ. संदिप क्षीरसागर

सभागृहात ज्या पद्धतीने सुरेश अण्णा धस बोलले. अजून पाच मिनिटें बोलले, असते तर सभागृह रडले असते. मोर्चात हिंदू, मुस्लिम, बौद्ध आणि अठरा पगड जातींचे लोक माणूस म्हणून आलेले आहेत. या वाल्मिक कराडला खंडणीच्या गुन्ह्यात अजून अटक नाही, त्याचा गुन्ह्यात थेट संबंध लागतो तरी त्याचे नाव नाही, असे आ.संदिप क्षीरसागर यांनी म्हटले. वाल्मिक कराडला संरक्षण धनंजय मुंडेचे असल्याचे बोलले जाते. वाल्मिक कराडला अटक झाली पाहिजे. फास्ट ट्रॅकमध्ये केस चालली पाहिजे. जोपर्यंत तपास होत नाही, तोपर्यंत धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेतला पाहिजे, अशी मागणी संदीप क्षीरसागर यांनी केली.

धनंजय मुंडे यांना मंत्रिमंडळात राहण्याचा नैतीक अधिकार नाही – खा.बजरंग सोनवणे

तुम्हाला खरेच संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांना न्याय द्यायचा असेल, आणि या बीड जिल्ह्याच्या मातीत तुमचा जन्म झाला असेल तर तुम्ही सांगा की, राजीनामा फेकून मी पुढील चौकशीसाठी समोर जात आहे. असे का तुम्ही करत नाही? तुम्हाला मंत्रीपद आमचे मुडदे पाडायला हवे आहे का? मुळात याचे नावच कशाला घ्यायचे, हा केवळ एक दलाल आहे. यांच्यावर बोलण्याइतपत हा मोठा नसल्याची घणाघाती टीका खासदार बजरंग सोनवणे यांनी केली. हे खंडणीखोर कोण हे बघितले तर आणि त्यांचे मास्टर माईंड तपासले तर लक्षात येईल की, धनंजय मुंडे यांना मंत्रिमंडळात राहण्याचा नैतिक अधिकार नाही, अशी टीका त्यांनी केली.

पंकूताई वाट वाकडी करून संतोषच्या घरी का गेला नाही? – आ.सुरेश धस

सुरेश धस म्हणाले की, माझा सवाल पंकू ताईंना आहे. छत्रपती संभाजीनगरला तुम्ही एअरपोर्टला उतरला होता. १२ डिसेंबरला गोपीनाथरावांची जयंती आहे, मान्य पण तुम्ही वाट वाकडी करून संतोषच्या घरी का गेला नाही? असा सवाल सुरेश धस यांनी केला. ते पुढे म्हणाले की, गोपीनाथ मुंडे यांनी अवैद्य धंदे बंद केले, पण पंकजाताई तुम्हाला चांगले लोकं चालत नाहीत. तुम्हाला जी हुजूर करणारे लोकं हवे आहेत. पंकूताई तुम्ही चुकला आहात, तुम्हाला द्यायचे असेल तर उत्तर द्या, अन्यथा नाही दिले तरी चालेल. ते पुढे म्हणाले की, मंत्रीपद भाड्याने दिले आहे, असे पंकू ताई म्हणत होत्या, पण मी म्हणतो केवळ पालकमंत्री पद नाही तर कृषीमंत्रीपदही भाड्याने दिले होते. धस यांनी पैसे गेले तरच फाईल मंजूर होतं होती. ही आमच्या जिल्ह्याची करूण कहाणी, करून कहाणी म्हणतो करुणा नाही, असे म्हणत त्यांनी धनंजय मुंडे यांच्यावर सडकून टीका केली. धस यांनी सांगितले की, पहिली बायको आहे ती करुणा, पण त्या मायमाऊलीची अवस्था बघा, असे त्यांनी सांगितले. १४०० हेक्टर एकर जमीन यांनी ढापल्याचा आरोप धस यांनी केला आणि यावेळी वेगवेगळे दावे करीत पुरावे सादर करून गैर कामांची यादीच वाचवून दाखविली.

बीड प्रकरणातील फरार आरोपींची संपत्ती जप्त करा

मुख्यमंत्र्यांचे सीआयडीला आदेश

मुंबई : बीड जिल्ह्यातील केजमधील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाला तीन आठवडे होत आले तरी सातपैकी तीन आरोपी अजूनही फरार आहेत. याचा निषेध करण्यासाठी शनिवारी बीडमध्ये सर्वपक्षीय नेत्यांकडून मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या मोर्चाला जिल्ह्यातील हजारो नागरिकांनी उपस्थित राहत आपला आक्रोश व्यक्त केला. त्यानंतर आता सरकार दरबारी कारवाईला वेग आला असून, बीड हत्या प्रकरणातील फरार आरोपींची संपत्ती जप्त करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सीआयडीला दिले आहेत.

संतोष देशमुख यांची हत्या केल्यानंतर तीन जणांना अटक करण्यात आली होती. त्यानंतर काही दिवसांनी चौथा ◀◀ पान २ वर

तर महाराष्ट्रमध्ये आग लागल्याशिवाय राहणार नाही–डॉ. जितेंद्र आव्हाड

बीडमध्ये वंजारी समाजाच्या अनेकांची हत्या झाली आहे. मी देखील जातीने वंजारी आहे. पण माझ्या बहिणीचे कुंकू पुसले गेले आहे. पुसले गेलेले कुंकू कोणी परत आणू देणार आहे का? तरीदेखील आपण राजकारण करतो. या ताईच्या भविष्याचा कोणाला विचार आहे का? असा सवाल जितेंद्र आव्हाड यांनी केला. मी शांत बसणार नाही, याविरोधात लढणार असल्याचे आव्हाड म्हणाले. तुम्ही वाल्मिक का म्हणता? हा वाल्मिक नाही वाल्या आहे. वाल्याचा वाल्मिकी झाला होता पण इथं वाल्मिकीचा वाल्या झाला असल्याचे आव्हाड म्हणाले. वेळेत कारवाई झाली नाहीतर महाराष्ट्रात आग लागल्याशिवाय राहणार नसल्याचे आव्हाड यावेळी म्हणाले.

मुंडेंची मंत्रीमंडळातून हकालपट्टी करा – छत्रपती संभाजी राजे

अजितदादा तुमच्यात धमक असेल तर धनंजय मुंडेंची मंत्रीमंडळातून हकालपट्टी करा, असा थेट हल्लाबोल संभाजीराजे छत्रपती यांनी केला. अजितदादा तुमची काम करण्याची पद्धत ही परखडपणाची असेल तर आता तुम्ही करेक्ट कार्यक्रम करा, असे संभाजीराजे म्हणाले. मला माहित नाही त्यांचा राजीनामा घेतील की नाही. पण बीडच्या सगळ्या जनतेला मला सांगायचे आहे की, त्यांना जर (धनंजय मुंडे) पालकमंत्रीपद दिले तर छत्रपती घराणे बीडचे पालकत्व घेणार असल्याचे संभाजीराजे म्हणाले. बीडचा बिहार करायचा आहे का? असा सवाल देखील संभाजीराजेंनी यावेळी उपस्थित केला.

तुमच्या राजकारणासाठी आमची अब्रु वेशीवर ; प्राजक्ता माळीला रडू कोसळले

मुंबई । प्रतिनिधी

माझ्याबद्दल आक्षेपार्ह विधान केल्याबद्दल भाजप आमदार सुरेश धस यांचा निषेध करते. तुमचे राजकारण तुम्हाला लखलाभ. तुमच्या राजकारणात कलाकारांना का खेचता ? आपला टीआरपी वाढविण्यासाठी कोणत्याही थराला जातात. तुमच्या राजकारणासाठी आमच्या सारख्या महिला कलाकारांची अब्रु वेशीवर का टांगता? असा संतप्त सवाल करताना अभिनेत्री प्राजक्ता माळीला रडू कोसळले. माळी शनिवारी (दि. २८) पत्रकार परिषदेत बोलत होत्या.

माळी पुढे म्हणाल्या की, भाजप आमदार सुरेश धस यांच्याविरोधात महिला आयोगाकडे तक्रार केली आहे. महाराष्ट्रातील राजकारण्यांना ही गोष्ट भूषणावह नाही. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांची लवकरच भेट घेऊन धस यांच्यावर ठोस कारवाई करण्याची मागणी करणार आहे. या गोष्टींचा माझ्या कुटुंबावर परिणाम होत आहे. महिला कलाकारांची ◀◀ पान २ वर

माफी मागणार नाही – आ. धस

अभिनेत्री प्राजक्ता माळी हिने बीडचे आमदार सुरेश धस यांनी आपली जाहीर माफी मागण्याची मागणी केली होती. पण आमदार धस यांनी मात्र माळी हिची माफीची मागणी धुडाकावून लावली आहे. पत्रकारांशी बोलताना त्यांनी माळी यांची माफी मागण्याचा प्रश्नच नाही अशी प्रतिक्रीया त्यांनी दिली आहे. बीड चे आमदार सुरेश धस यांनी परळीमध्ये इंव्हेट मॅनेजमेट पॉलिटिक्स चालते असा आरोप केला होता. यावेळी त्यांनी अभिनेत्री प्राजक्ता माळी हिचे नाव घेतले होते. याचा विरोध म्हणून प्राजक्ता माळी हिने पत्रकार परिषद घेऊन धस यांनी माफी मागावी अशी मागणी केली. तसेच महिला आयोगाकडे तक्रारही दाखल केली. यासंदर्भात धस यांना पत्रकारांनी छेडले असता. माळी यांनी माझा निषेध केला आहे तर मीही प्राजक्ता माळी हिचा निषेध करतो. तसेच यापूढे तिचा कोणताही कार्यक्रम पाहणार नाही असेही धस यांनी म्हटले आहे.

अग्रलेख

सोडणार नाही पण पकडणार कधी?

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीड जिह्यातील मस्साजोगचे सरपंच देशमुख यांच्या खुन्यांना, ते कोणीही असतील तरी सोडणार नाही अशी ठिकठिकाणी घोषणा केली आहे. मात्र मात्र तीन आठवडे उलटत आले तरी महाराष्ट्र पोलिसांना हा जो 'कोणीही' आहे तो सापडलेला नाही. सरकार विधिमंडळात जेव्हा बोलते तेव्हा त्यांचे बोल खरे करण्याची नोकरशाहीची तयारी हवी असते. पण, अधिकारी बीड जिह्याला अपवाद करत आहेत. विरोधकांचे काम सत्तापक्षाचे आमदार करत आहेत. न्याय कधी होणार हा प्रश्नच आहे. त्यात महाराष्ट्रात चिमुरड्यांवर सुरू असणारे अत्याचार डोळ्यात अश्रू उभे करत आहेत. ही स्थिती बदलली पाहिजे.

बीडचे एक निवृत्त जिल्हाधिकारी उघडपणे प्रसार माध्यमांपर्यंत येतात आणि त्या जिह्यात घडत असलेल्या प्रत्येक घटनेचे वर्णन करतात. त्यावरून या जिह्यात गेली काही वर्षे कसले जंगलराज सुरू आहे याचे दाखले मिळतात.

सत्ताधारी आमदार सुरेश धस खून कसा झाला, याचे साद्यंत वर्णन करतात. सलग चार तास मारत मारत एक एक अवयव निकामी करत खून केला जातो आणि कोणीतरी व्हिडीओ कॉलवर ही मारामारी पाहत असतो हे भयानक आहे. सत्तापक्षाच्या त्याच जिह्यातील दुसरे आमदार आपल्या बूथ प्रमुखाला मारले आहे म्हणून न्याय मागतात. विरोधी आमदार जितेंद्र आव्हाड या जिह्यात ४० पेक्षा अधिक लोक बेपत्ता असून त्यांचे खून झाले आहेत, मी ठिकाणे सांगतो तिथे सरकारने उकरावे असे आव्हान देतात. या जिह्यात सेवेला आलेला एक अधिकारी बदली झालेल्या दिवसापासून बेपत्ता आहे आणि त्याचा शोध लागलेला नाही, सरकारी यंत्रणेला तो सापडला नाही असे माजी जिल्हाधिकारी सांगतात. या जिह्यात थर्मल प्रकल्पातील कोळशाची कशी लूट सुरू आहे, गौण खनिज कसे लुटले जाते, नदी पात्राची कशी वाट लावली गेली आहे आणि कितीही उपसा झाला तरी तो रोखण्याचे धाडस कोण कसे दाखवणार? त्याऐवजी असा व्यवहार करणाऱ्यांना मिळून स्वत: मालामाल होऊ इच्छिणारा अधिकारीच तेवढा इथे टिकतो आणि अशी एक व्यवस्था या जिह्यात तयार झाली आहे असा आरोप होत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात सरकार गंभीरपणे कारवाई करेल असा शब्द दिला आहे. त्याच बरोबर परभणीतली दलित कार्यकर्ते सुर्यवंशी यांचा कोठडीत मारहाणीत झालेला मृत्यू सुध्दा चर्चेत आहे. दोन्ही प्रकरणात पोलीस अधिकारी बेफिकिरी आणि कायदा तोडून वागले आहेत असा आरोप झालेला आहे. त्याची चौकशी होत राहील. पण, राजकारणाचे हे सत्तेच्या आश्रयाने सुरू असणारे गुन्हेगारीकरण खूपच खतरनाक आहे.

सुमारे महिनाभरापूर्वी एका तुरुंगवारी घडलेल्या अधिकाऱ्याने पत्रकार परिषद घेऊन काही राजकीय नेत्यांवर आभासी चलनाद्वारे मोठा आर्थिक व्यवहार केल्याचा आरोप केला होता. यामध्ये त्यांनी काही आयपीएस अधिकाऱ्यांची देखील नावे घेतली होती. या प्रकरणानंतर राज्यात बऱ्याच राजकीय घडामोडी उलट्या पालट्या पद्धतीने घडल्या होत्या. हे प्रकरण लोकांच्या विस्मरणात जाईपर्यंत शुक्रवारी धस यांनी आणखी एक बॉम्ब फोडला. आपल्या मतदार संघातील एका सामान्य व्यक्तीने महादेव ॲपवरून एका दिवसात तब्बल ९०० कोटी रुपयांचे व्यवहार केले असून त्याची चौकशी व्हावी अशी मागणी केली आहे. या सर्व प्रकाराशी सर्वसामान्य माणसाचा काहीही संबंध नसतो. मात्र राजकारणी मंडळींचे कान मात्र टवकारले जातात. कारण, हे काय सुरू आहे याची फक्त त्यांनाच माहिती असते.

क्स माध्यमावर गजाभाऊ नावाने एक अमेरिकास्थित सांगलीकर युवक गेली अनेक वर्षे लिहीत आहेत. त्यांनी मांडलेले मुद्देही राजकीय वर्तुळात चर्चेत असतात. हजारो लोक त्यावर व्यक्त होतात. त्यांना एकाने एक्सवरच धमकावले आणि जगात कुठेही असले तरी खेचून आणण्याचे इशारे दिले. अर्थात यापूर्वीही त्यांची अधिकाऱ्यांनी खासगीत चौकशी केली. पोलिसांनी पालकांना बोलवून माहिती घेतली. तरीही ते व्यक्त होतच आहेत. अलीकडेच असेच एक प्रकरण आणि संवादाचे क्रीन शॉट माध्यमांवर टाकले. एका नामवंत युट्यूबरनेही ही कसली भानगड? असा प्रश्न करून सगळा संवाद वाचून दाखवला आहे आणि सरकारने याची चौकशी करण्याची मागणी केली आहे. यातील बऱ्याच घटना या निवडणुकीपूर्वी घडलेल्या असून त्या आता का जाहीर केल्या जात आहेत हे समजायला जागा नाही. एकूणच राज्याच्या राजकारणात या काही घटना खळबळ उडवत असताना नेते मात्र मौन बाळगून आहेत. आवाज उठवणाऱ्या व्यक्तींवर दबाव टाकणे, त्यांना गुंतवणे, त्यांचा खून करणे या घटना महाराष्ट्राला शोभत नाहीत. हे कधी थांबणार आहे की नाही असा प्रश्न पडतो. सरकार नुसतेच कारवाई करू असे म्हणते मात्र कधी कारवाई करणार तो दिवस काही येताना दिसत नाही.

सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटुंबियांना १ कोटीची भरपाई द्या

ॲड.प्रकाश आंबेडकरांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

मुंबई । प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी शनिवारी सकाळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी परभणी घटनेच्या संदर्भात महत्वाच्या मागण्या केल्या. परभणी प्रकरणातील पीडित सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटुबियांना १ कोटी रुपयांची भरपाई द्यावी असे ते म्हणाले.

परभणी प्रकरणातील पीडित सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबियांना १ कोटी रुपये नुकसान भरपाई द्यावी. सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरी द्या. परभणीत पोलिसांनी क्रूरतेने केलेल्या मारहाणीत बळी पडलेल्यांची यादी करण्यासाठी आणि पुरेशी भरपाई देण्यासाठी सर्वेक्षण करा. १ जानेवारी रोजी होणाऱ्या भीमा कोरेगावच्या अभिवादन सोहळ्यापूर्वी फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारांविरुद्ध कोणत्याही प्रकारचा हिंसाचार आणि चुकीची माहिती भडकावण्याच्या कोणत्याही प्रयत्नांवर लक्ष ठेवण्यासाठी आणि ते हाणून पाडण्यासाठी पोलिसांना निर्देश द्यावेत. आदिवासी विद्यार्थ्यांसाठी थेट लाभ हस्तांतरण योजना रद्द करा आणि पूर्वीची प्रणाली पुन्हा सुरू करावी. अशा पाच मागण्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सोबतच्या बैठकीत आंबेडकर यांनी केल्या. तसेच प्रकाश आंबेडकर पुढे बोलताना म्हणाले की, परभणीत पोलिसांनी क्रूरपणे केलेल्या मारहाणीत बळी पडलेल्यांची यादी करून त्यांना पुरेशी भरपाई देण्याची आणि आदिवासी विद्यार्थ्यांसाठी डीबीटी रद्द करण्यासाठी सल्लामसलत करण्यासाठी, सर्वेक्षण करण्याची आमची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्य केले असल्याचेही यावेळी सांगितले.

सीसीएमपी केलेल्याच होमिओपॅथीच्या डॉक्टरांना देता येणार ॲलोपॅथी औषधे !

नोंदणीकृत ९० हजार होमिओपॅथी डॉक्टरांपैकी केवळ २५ हजार डॉक्टरांनीच केलाय सीसीएमपी कोर्स

पुणे । प्रतिनिधी

राज्यात सुमारे ९० हजार होमिओपॅथीचे डॉक्टर नोंदणीकृत आहेत. त्यापैकी केवळ २५ हजार डॉक्टरांनी राज्य शासनाचा मान्यता प्राप्त सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फार्माकॉलॉजी (सीसीएमपी) अभ्यासक्रम उत्तीर्ण केला आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या डॉक्टरांनाच ॲलोपॅथी औषधे देण्याची परवानगी असल्याचे अन्न आणि औषध प्रशासनाने नमूद केले आहे.

राज्याच्या अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त (औषध विभाग) राजेश नार्वेकर यांनी याबाबतचे परिपत्रक राज्यातील सर्व विभागीय सहआयुक्त (औषधे), सहायक आयुक्त (औषधे) व औषध निरीक्षक यांना जारी केले आहे. होमिओपॅथी डॉक्टरांनाही ॲलोपॅथी प्रॅक्टिस करण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी अनेक वर्षांपासून संघटनेकडून होत होती. सीसीएमपी अर्हताप्राप्त वैद्यकीय व्यावसायिक हा महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम १९६५ अन्वये वैद्यक व्यावसायिक

या व्याख्येत समाविष्ट आहे. त्याला आधुनिक चिकित्सा पद्धतीची औषधे वापरून वैद्यकीय व्यवसाय करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे, असे या परिपत्रकात नमूद केले आहे. औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० अंतर्गत नियमानुसार नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांनी दिलेल्या प्रिस्क्रिप्शनवर औषध विक्रेत्यांना औषध देऊ शकतात. तसेच या डॉक्टरांना घाऊक औषध विक्रेते किंवा किरकोळ औषध विक्रेते ॲलोपॅथीच्या औषधांची विक्री करू शकतात, असे या परिपत्रकामध्ये म्हटले आहे. मात्र औषधांची विक्री करण्यापूर्वी यावर त्यांचा रजिस्ट्रेशन क्रमांक व सीसीएमपी ही अर्हता प्राप्त केल्याबाबतचा सर्टिफिकेट क्रमांक नमूद असणे आवश्यक आहे.

उर्मिला कोठारे यांच्या कारने दोघांना उडविले

मुंबई । प्रतिनिधी

अभिनेत्री उर्मिला कोठारेंच्या कारचा भीषण अपघात झाला असल्याची धक्कादायक माहिती सध्या समोर येत आहे. उर्मिलाच्या कारने २ मजुरांना उडवले असल्याचीही माहिती आहे. यामध्ये एका मजुराचा मृत्यू झाला तर दुसरा मजूर गंभीर जखमी झाला. उर्मिला आणि तिचा ड्रायव्हरही या अपघातात जखमी झाल्याची माहिती आहे.

शुटिंग संपवून घरी परतत असताना उर्मिलाच्या कारचा हा अपघात झाला. या अपघातात उर्मिलाही गंभीर जखमी झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार गाडीची एअर बॅग योग्य वेळी उघडल्याने अभिनेत्रीचा जीव वाचला, असे असले तरीही तिच्या कारचा मात्र चक्काचूर झाला असून यामध्ये एकाचा मृत्यू झाला. मुंबईतील कांदिवली परिसरातील पोईसर मेट्रो स्टेशनजवळ ही घटना घडली. मेट्रोमध्ये काम करणा-या दोन मजुरांना भरधाव कारने धडक दिली, या घटनेत एका मजुराचा मृत्यू झाला तर दुसरा मजूर गंभीर जखमी झाला. अभिनेत्री उर्मिला काल रात्री तिचे शूटिंग संपवून कारमधून घरी जात होती. त्यावेळी हा अपघात घडला.

नेकनूरमध्ये एकावर कुऱ्हाडीने जीवघेणा हल्ला

नेकनूर । प्रतिनिधी

दोन युवकाच्या भांडणात एकाला डोक्यात कुऱ्हाडीचे गंभीर वार बसले असून उपचारासाठी संभाजीनगर येथे हलवण्यात आले आहे. त्याची प्रकृती चिंताजनक असून, नेकनूर पोलीस स्टेशनच्या पाठीमागील भागात शुक्रवारी रात्री साडेअकरा वाजता ही घटना घडली. सतरा वर्षीय आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

नेकनूर येथील शिक्षक कॉलनी भागातील रहिवाशी राजाभाऊ रामभाऊ कोकाटे (वय ३८) घरातून गावात असलेल्या एका गोंधळाच्या कार्यक्रमासाठी जातो म्हणून बाहेर पडला. या कार्यक्रमाच्या ठिकाणापासून काही अंतरावर पोलीस स्टेशनच्या पाठीमागील भागात रात्री साडेअकरा वाजता त्याचा गावातीलच सुमित बबन किरविले (वय १७) याच्याशी कुठल्यातरी कारणावरून वाद झाला. यातुनच सुमितने कुऱ्हाडीने राजाभाऊच्या डोक्यात वार केले. यामुळे गंभीर अवस्थेत राजाभाऊ कोकाटे याला संभाजीनगर येथील रुग्णालयात हलवण्यात आले असून, त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले. आरोपी सुमित किरविले याच्यावर राजाभाऊच्या पत्नीच्या फिर्यादीवरून कलम १०९,११८ (२)नुसार नेकनूर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबतचा अधिक तपास सपोनि चंद्रकांत गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

बिबट्याने गाईचे वासरू खाल्ले

वनविभागाचा पिंजरा गायब;शेतकऱ्यांनो फटाके वाजवा!

जालना । प्रतिनिधी

घनसावंगी तालुक्यातील तीर्थपुरी-खापरदेव हिवरा शिवाराच्या हद्दीवर असलेल्या निवृत्ती जारे यांच्या गाईच्या वासराचा बिबट्याने फडशा पाडल्यामुळे शेतकरी वर्गात कमालीची घबराट निर्माण झाली आहे. याप्रकरणी वन विभागाकडे पिंजरा नसून गायब असल्याचे बोलल्या जात आहे.



तीर्थपुरी येथील शेतकरी निवृत्ती जारे यांचे हिवरा शिवारात गट नंबर ११५ मध्ये शेत आहे. त्यांच्या शेतात मोसंबी व उसाचे पीक सद्यस्थितीत उभे आहे. जनावरांसाठी त्यांनी शेतातच गोठा तयार केलेला आहे. व त्यात तीन म्हशी, एक गाय व तीन वगारी अशी जनावरे आहेत रात्री बिबट्याने या गोठ्यावर येऊन त्यातील गाईच्या स्त्री जातीच्या वासरावर हल्ला केला व तिला ओढत बाजूच्या शेतात नेले. दरम्यान या हल्ल्यात वासरू मरण पावल दरम्यान गेल्या काही दिवसापासून एकलहेरा शिवारात बिबट्या असल्याची चर्चा आहे. अनेक शेतक-यांनी बिबट्या बघितल्याचे सांगितले आहे मात्र वनविभागाकडून याची अद्याप पर्यंत दखल घेण्यात आलेली नाही. आजही दिवसभरात अनेकदा फोन केल्यानंतर सायंकाळी राठोड नावाचे एक कर्मचारी फक्त नावापुरतं घटनास्थळी येऊन पाहणी करून गेले. असे शेतकऱ्याकडून सांगण्यात आले.

माजलगावात संत जगनाडे महाराज यांची पुण्यतिथी मिरवणुक, रक्तदान शिबिर

ह.भ.प. विजय महाराज गवळी यांच्या व्याख्यानाने संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव शहरात दि.२८ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते ११ वा. पर्यंत संत जगनाडे महाराज यांची रथामध्ये भव्य ढोलताशासह मिरवणुक काढण्यात आली. यामध्ये मोठ्या प्रमाणावर समाजातील महिला, पुरुषांचा सहभाग होता.

त्यानंतर सकाळी ११.०० ते १.०० वा. ह.भ.प. विजय महाराज गवळी (छत्रपती संभाजीनगर) यांचे संत तुकाराम महाराज व संत जगनाडे महाराज यांच्या जीवनाविषयी व्याख्यान संपन्न झाले त्यामध्ये गवळी महाराजांनी सांगितले की, चांगले कर्म करणारी व्यक्ती ही तुकोबाच्या गाथेप्रमाणे असते, तिला कोणी किती बुडवण्याचा प्रयत्न केला तरी तराऊन जाते तसेच समाजप्रबोधन असे व्याख्यान करून राज्यातील वाईट घटना थांबवायच्या असतील तर संत तुकाराम महाराज यांच्या गाथेचा अभ्यास घराघरात झाला पाहिजे व त्याचे अनुकरण केले पाहिजे. तसेच संत जगनाडे महाराज यांनी संत तुकाराम महाराज यांच्या अभंगाचे कसे रक्षण केले याबाबत सविस्तर कथन व्याख्यानामध्ये केले. तसेच मोबाईल व टि.व्ही. याचे दुष्परिणामा बाबत भाष्य केले व तरुणांना आर्थिक ध्येयाबाबतच सामाजिक जाण असावी असे उद्गार केले. कार्यक्रमामध्ये तेली समाजाच्या एकीचे दर्शन दिसले. तसेच सकाळी ९.०० ते ४.०० वा. भव्य रक्तदान शिबीर तेली समाजाचे बांधव, संताजी युवा सेना व श्री प्रभू श्री राम प्रतिष्ठान यांच्या योगदानातून संपन्न झाले. यामध्ये ६० लोकांनी रक्तदान केले. तसेच दुपारी १.०० ते ५.०० वा. महाप्रसादाचा कार्यक्रम संपन्न झाला. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तेली समाज बांधव, संताजी युवा सेना माजलगाव यांनी परिश्रम घेतले.

पान १ वरून...

शेतकऱ्यांसाठी १०० दिवसांत

अंदाज आहे. काही भागात प्रशासनाने पंचनामे सुरू केले. पण बहुतांश भागात पंचनामे सुरू करण्यात आले नाहीत. राज्याचे नवे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे खानदेशातील असूनही कार्यवाही होताना दिसत नाही. आधीच शेतकऱ्यांच्या कांद्याला किफायतशीर दर मिळत नसल्याने शेतकरी मेटाकुटीला आले आहेत. केंद्र सरकारने कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क हटवण्याची मागणी शेतकरी करत आहेत. पण या मागणीची दखल केंद्र सरकार घ्यायला तयार नाही. नवे कृषिमंत्री मात्र मागील आठवड्याभरात दिलेल्या सर्व मुलाखतीत कांदा उत्पादकांसाठी केंद्रीय मंत्र्यांशी भेटणार आहे, दिल्लीला जाणार आहे, हे सांगण्यातच दंग आहेत. प्रत्यक्ष मात्र कांदा उत्पादकांना आस्मानी आणि सुलतानीचा सामना करावा लागत आहे. परिणामी शेतकऱ्यांची परिस्थिती अधिक गंभीर झाली आहे. अवकाळी आणि गारपीटीचे पंचनामे तातडीने करून शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत करावी, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. त्या पार्श्वभुमीवर १०० दिवसांच्या आराखड्यात शेतकऱ्यांना केंद्र बिंदु ठेवण्याचे आदेश मुख्यमंत्री फडणवीसांनी दिले आहेत. त्यामुळे पहिल्या शंभर दिवसांमध्ये शेतकऱ्यांच्या सोयाबीन कापसाच्या खरेदीची गती वाढवणे, ठिबक तुषार सिंचनाचे अनुदान जमा, पिकविम्याचा गोंधळ नीट करणे, अतिवृष्टी मंजूर निधी शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करणे, रखडलेल्या दूध अनुदानाचा प्रश्न मिटवणे, यासारख्या गोष्टींचा निकाल लावावा लागेल. तसेच शेतकरी केंद्री दीर्घकालीन धोरणात्मक निर्णयही घ्यावे लागतील. त्यासाठी राजकीय इच्छा शक्ती वापरावी लागेल. तर शेतकऱ्यांच्या काहीसा आर्थिक दिलासा मिळेल.

माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन

निगम बोध घाटावर शनिवारी दुपारी १ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे नेते राहुल गांधी, खासदार प्रियांका गांधी यांच्यासह दिग्गज नेते डॉ. मनमोहन सिंग यांच्या अंत्यविधीला उपस्थित होते. भूतानचे राजे जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक आणि मॉरिशसचे परराष्ट्र मंत्री मनीष गोबिन हे देखील निगम बोध घाटावर मनमोहन सिंग यांना अखेरचा निरोप देण्यासाठी उपस्थित होते.

धनंजय मुंडेंना मंत्रिमंडळातून

आहोत, आम्हाला न्याय द्यावा अशी एकमुखाने मोर्चातून मागणी करण्यात आली. बीडमधील या विराट मोर्चाला जिल्ह्यातील जनतेचा अभूतपूर्व असा प्रतिसाद मिळाला. त्यामुळे सरकारवर वाल्मिक कराड याच्यावर कारवाई करण्यासाठी दबाव वाढला आहे. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला तब्बल १९ दिवस उलटून गेल्यानंतरही प्रमुख आरोपी अजूनही सापडत नसल्याने आणि खंडणीखोर वाल्मिक कराड अजूनही फरार असल्याने पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. जर आरोपी सापडले नाही तर आणि जातीयवादी मंत्र्याला पोसणार असाल, तर दंडूके हाती घ्यावे लागेल, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी दिला. माजी खासदार संभाजी राजे छत्रपती यांनी जर धनंजय मुंडेंना बीडचे पालकमंत्रीपद दिल्यास छत्रपती घराणे या जिल्ह्याचे पालकत्व घेईल असे सांगितले. यावेळी आ.नरेंद्र पाटील, अभिमन्यू पवार यांनीही आपली भुमिका मांडली.

बीड प्रकरणातील फरार

आरोपी पोलिसांच्या हाती लागला. मात्र अजूनही तीन जण फरार आहेत. महाराष्ट्रभर संताप व्यक्त केला जात असताना आरोपींना अजून अटक होत नसल्याने पोलिस प्रशासन आणि गृहखात्यावर टीकेची झोड उठली आहे. या पार्श्वभूमीवर आता राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कठोर पाऊल उचलले असून फरार आरोपींची मालमत्ता जप्त करण्याची कारवाई करण्याच्या सूचना दिल्याचे समजते. दरम्यान, बीडमध्ये जवळपास १२०० लोकांना शस्त्र परवाना देण्यात आला असल्याने जिल्ह्यात अनेकदा गोळीबाराच्या घटना घडत आहेत. हवेत गोळीबार करून दहशत माजवण्याचा प्रयत्नही अनेकांकडून होत असल्याचे व्हीडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. अशा स्टंटबाजांवर कारवाई करून त्यांचा परवाना रद्द करून शस्त्र जमा करावेत, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत.

तुमच्या राजकारणासाठी आमची अब्रु

अब्रु वेशीवर टांगली जात आहे. कलाक्षेत्र बदनाम नाही. तुमच्या स्वार्थासाठी राजकारणी कलाक्षेत्र बदनाम करत आहेत. यापूर्वी अनेक नेत्यांबरोबर कार्यक्रम केले आहेत. महिलाच्या कर्तृत्वावर प्रश्नचिन्ह उभे करत आहात. माझ्यावर टिप्पणी करून स्वत:ची मानसिकता दाखवून दिली आहे, ही खेदाची बाब आहे. फोटोचा संदर्भ घेऊन कुणासोबतही संबंध कसा काय जोडता? असा सवालही माळी यांनी केला. पुरूषांच्या मदतीशिवाय एक महिला स्वत: च्या पायावर उभी राहू शकत नाही का?, असा संतप्त सवाल व्यक्त करताना माळी यांना अश्रू अनावर झाले. राजकीय कारणासाठी सिनेसृष्टीतील महिलांच्या नावाचा वापर निंदनीय असून असे वागणे राजकारण्यांना सोबत नाही. चिखलफेक होऊ नये, म्हणून मी गप्प बसले. पण लाखोंचे प्रतिनिधित्व करणारे आमदार जेव्हा चिखलफेक करतात. तेव्हा ही गोष्ट गांभीर्याने घ्यावी लागते. करुणा मुंडे यांनीही काही दिवसांपूर्वी माझ्याबद्दल आक्षेपार्ह विधान केले होते. त्यावेळीही मी नोटीस देणार होते, असेही माळी म्हणाल्या.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार, दि.२९ डिसेंबर २०२४

वैध,अवैध शस्त्रांचे फोटो अथवा व्हिडिओ समाज माध्यमावर पोस्ट करू नयेत केल्या असतील तर त्या तात्काळ डिलीट कराव्यात – स.पो.नि.मंगेश साळवे

आष्टी । प्रतिनिधी

अंभोरा पोलीस ठाणे हद्दीतील नागरिकांनी आपल्या जवळील वैध अथवा अवैध शस्त्रांचे प्रदर्शन आणि भीती निर्माण करणाऱ्या पोस्ट सोशल मीडिया अकाउंट वरून करू नयेत असे आदेश नूतन पोलीस अधीक्षकांनी दिले आहेत त्याचे काटेकोर पालन करावे असे आवाहन अंभोरा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे यांनी समाज माध्यमाद्वारे केले आहे असे आवाहन करताना त्यांनी म्हटले आहे की, नव्याने पदभार घेतलेले मा.पोलीस अधीक्षक नवनीत कौंवत यांनी याबाबत अत्यंत कठोर भूमिका घेतलेली आहे त्यांनी याबाबत दिलेले निर्देश सर्वांनी काटेकोरपणे पालन करावेत कोणत्याही व्यक्तीने मोबाईल किंवा इंटरनेट वरून आपल्या जवळील वैध किंवा अवैध असलेले शस्त्राचे प्रदर्शन सोशल मीडियावर फोटो अथवा व्हिडिओ त्याचबरोबर एखाद्या मारामारीच्या घटनेचे चित्रीकरण, फोटो सोशल मीडिया, व्हाट्सअप द्वारे करून समाजामध्ये भीती पसरवण्याचे काम करू नये ज्यांनी अशा प्रकारच्या पोस्ट यापूर्वी प्रसारित केल्या असतील त्यांनी त्या तात्काळ समाज माध्यमावरून डिलीट कराव्यात आणि यापुढे अशा प्रकारच्या पोस्ट पुढे पाठवू नयेत अन्यथा त्यांचे विरुद्ध कठोर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल अशी सक्त ताकीद बीड जिल्ह्याचे नव्याने पदभार स्वीकारलेले पोलीस अधीक्षक मा.नवनीत कौंवत यांनी दिलेली आहे त्याचे काटेकोर पालन सर्वांनी करावे असे आवाहन त्यांनी शेवटी केले आहे.

बालझुंबड या उपक्रमात तालुक्यातील जास्तीत जास्त शाळा व विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे-राजकिशोर मोदी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळाच्या वतीने प्रति वर्षाप्रमाणे यावर्षीही सलग पंचवीसाव्या बालझुंबडचे आयोजन करण्यात आले आहे. अंबाजोगाई तालुक्यातील सर्व शाळा व शालेय विद्यार्थ्यांसाठी दिनांक ३ जाने ते ८ जाने २०२५ या दरम्यान बालझुंबडचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमामुळे तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना चालना मिळते.तेव्हा अंबाजोगाई तालुक्यातील जास्तीत जास्त शाळा व शाळेतील विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन संयोजक प्रियदर्शनी क्रीडा व सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष राजकिशोर मोदी , सांस्कृतिक विभाग प्रमुख दिनकर जोशी व संचालक संकेत मोदी यांनी केले आहे .

मागील २४ वर्षापासून प्रियदर्शनी क्रीडा मंडळाच्या वतीने बालझुंबड हा उपक्रम अंबाजोगाई शहरात अखंडीतपणे राबविण्यात येत आहे. यंदाचे वर्ष हे बालझुंबड या उपक्रमाचे रौप्य महोत्सवी वर्ष म्हणून साजरा करण्यात येत आहे. प्रतिवर्षी तालुक्यातील सर्व शाळां या उपक्रमात उत्स्फूर्त असा प्रतिसाद देत असतात. याही वर्षी तालुक्यातील सर्व शाळा यामध्ये सहभागी होतील अशी अपेक्षा राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केली आहे.बालझुंबड हा उपक्रम तालुकास्तरावर आयोजीत केला जात असल्यामुळे त्यासाठी आवश्यक ते नियोजन देखील त्याचप्रमाणे मंडळाच्या वतीने करण्यात येत असते. या उपक्रमातुन अंबाजोगाई तालुक्यातील विविध शालेय विद्यार्थ्याच्या कलागुणांना यातून संधी प्राप्त होत आहे. क्रीडा मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते विद्यार्थ्यांच्या स्वागताच्या तयारीत असून हा उपक्रम अतिशय शिस्तबध्द व नियोजन बद्ध पार पाडण्यासाठी सज्ज झाले आहेत. रौप्यमहोत्सवी वर्षामुळे यंदा स्पर्धेचे वैशिष्टयपुर्ण नियोजन करुन तालुक्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेण्यासाठी संयोजक प्रयत्नशील आहेत. बालझुंबड-२०२५ या उपक्रमांतर्गत इ.१ ली ते ४ थी गटासाठी रंगभरण स्पर्धा, वैयक्तीक नृत्य, समुह नृत्य, इ. ५ वी ते ७ वी व इ. ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यासाठी पी.पी.टी. स्पर्धा ( ), प्रश्नमंजुषा स्पर्धा ( ), चित्रकला, वैयक्तीक नृत्य, समुहनृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या आहेत. तालुक्यातील सर्व विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करुन देण्यासाठी बालझुंबड हे खुले व्यासपीठ आहे. अंबाजोगाई तालुक्यातील जवळपास ७० ते ८० शाळेतील विद्यार्थी आपल्या शाळांच्या माध्यमातून सहभागी होतात. बालझुंबडच्या माध्यमातून आजपर्यंत अनेक गुणी कलावंत तयार झाले असून ते नाटक, सिनेमा तसेच क्रीडाविश्वाच्या माध्यमातून विविध खेळाडू व कलांच्याद्वारे आपल्या छाप अवघ्या महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशभर पाडत आहेत. तालुक्यातील अनेक शाळांमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन होत नाही अशा शाळा व शाळेतील विद्यार्थ्यांसाठी बालझुंबड ही केवळ एक स्पर्धा नसून एक पर्वणीच ठरल्या जात आहे. बालझुंबड हा तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी एक स्नेह मेळावा, स्नेह संमेलन तथा आनंदोत्सवच ठरतो. यामध्ये सर्व स्पर्धकांना विनामूल्य प्रवेश दिला जातो. तेव्हा सर्व स्पर्धकांनी आपले प्रवेश निश्चित करण्यासाठी आपल्या शाळेतील मुख्याध्यापक किंवा संयोजक यांचेशी संपर्क साधुन तात्काळ आपला प्रवेश नोंदवावा.

स्पर्धेच्या अधिक माहिती व प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी पालकांनी व शिक्षकांनी समन्वयक, बालझुंबड- २०२५, जोधाप्रसादजी माध्यमिक विद्यालय गुरुवारपेठ, अंबाजोगाई येथे संपर्क साधावा व अंबाजोगाई तालुक्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे संयोजक राजकिशोर मोदी, सांस्कृतिक विभाग प्रमुख दिनकर जोशी, संचालक संकेत मोदी तसेच समन्वयक राजेश कांबळे, मुख्याध्यापक आनंद टाकळकर , विनायक मुंजे संपर्क क्र.९८६०३३७००८/ ९८५०५९१०६१ /९४२१३४१६८८) यांनी केले आहे. बालझुंबड-२०२५ हा कार्यक्रम न्यू व्हिजन पब्लिक स्कुल, विलासराव देशमुख सभागृह तसेच मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात संपन्न होणार असल्याची माहिती संयोजकांच्या वतीने देण्यात आली आहे.

मंत्री अतुल सावे यांची पालकमंत्रीपदी निवड करावी -ओबीसी समाजाची मागणी

अंबड । प्रतिनिधी

मा.श्री.ना.अतुलजी सावे यांना जालना जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून निवड करण्यात यावी असे समस्त ओबीसी समाज जालना यांच्या वतीने जालना जिल्हाधिकारी यांच्या मार्फत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना निवेदन पाठविण्यात आले. असे मागणीचे निवेदन सकल ओबीसी समाजाच्या वतीने करण्यात आला यावेळी गणेश पाऊलबुद्धे,गोरख हिरे, प्रदीप जिवणे,शाम पिराने, सावता कटारे, संतोष राऊत,विक्रम भगवत, बळीराम पुंड, स्वप्नील पवार,कृष्णा सोनमारे,विशाल पवार,दत्ता नरुके आदी ओबीसी समाज बांधव उपस्थित होते.

जिल्हा परिषद व पंचायत समिती भाजपच्या ताब्यात घेण्यासाठी कार्यकर्त्यांनी सज्ज रहावे -भास्कर दानवे

जालना । प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टी जालना ग्रामीण मंडळाची सदस्यता नोंदणी अभियान कार्यशाळा आज दिनांक २४ डिसेंबर २०२४ रोजी भाजपा जिल्हा जालना कार्यालयात आयोजीत करण्यात आली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी भाजपा जालना विधानसभा प्रमुख श्री.भास्कर (आबा) दानवे तर भाजपा जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे,प्रदेश निमंत्रीत सदस्य रामेश्वर भांदरगे, भाजपा जिल्हा सरचिटणीस सिध्दीविनायक मुळे,भाजपा जिल्हा चिटणीस बाबुराव खरात, युवा मोर्चा जिल्हध्यक्ष भागवत बावणे,भाजपा तालुकाध्यक्ष वसंतराव शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी जिल्ह्यातील भाजपा पदाधिकाऱ्यांशी पुढे बोलताना भास्कर (आबा) दानवे म्हणाले की, आपल्या पक्षाची ताकद काय आहे हे दाखवून देण्यासाठी आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीवर भाजपाचा झेंडा फडकविण्यासाठी पदाधिकारी व कार्यर्त्यानी मोठ्या प्रमाणात सदस्य नोंदणी करणे गरजेचे आहे. दर तीन वर्षांनी भाजपाचे सदस्य नोंदणी अभियान राबविले जाते. देशातील नव्हेच तर जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष भारतीय जनता पार्टी ठरलेला आहे. पुन्हा एकदा त्याच शिखरावर आपल्या पक्षाला न्यायचे आहे. भारतरत्न श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी नेहमी सांगायचे सतत चालत रहा थांबायचे नाही थांबलो तर संपला त्याप्रमाणे आपण अधिक जोशाने सदस्य नोंदणी करा, यासाठी अत्यंत सोपी पद्धत आहे. सदस्य होण्यासाठी केवळ ८८ ०००० २०२४ या क्रमांकावर मिस्ड कॉल करा व सदस्य व्हा तसेच आपली वैयक्तीक माहिती द्यायची असल्यास मिस्ड कॉल केल्यानंतर आपल्याला एसएमएस मेसेज येईल त्यामध्ये आलेल्या लिंक वर जाऊन आपण माहिती भरू शकता. तसेच आपला सदस्य नोंदणी क्रमांकासहित आपला फोटोसह सदस्य भाजपा नोंदणी चे कार्ड डाऊनलोड करू शकता. भाजपा सदस्य नोंदणी अभियान २०२४ हे १ जानेवारी ते १५ जानेवारी २०२५ पर्यंत विशेषता राबविण्यात येत आहे. त्यामुळे जास्तीजास्त सदस्य नोंदणी करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळी भाजपा जिल्हा पदाधिकारी,मंडळ पदाधिकारी, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य,सरपंच,उपसरपंच, शक्तीकेंद्र प्रमुख,बुथप्रमुख व कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

बीड : शिवसंग्रामचे नेते सुहास पाटील यांचे चिरंजीव ओंकार याचा विवाह नुकताच पार पडला, त्यानिमित्त आ.विजयसिंह शिवाजीराव पंडित यांनी सुहास पाटील यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली व नवदाम्पत्याला शुभआशीर्वाद दिले. गेल्याअनेक वर्षांपासून सुहास पाटील हे सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात कार्यरत आहेत. ते सर्वच घटकाशी सुमधूर संबंध ठेवून आहेत. पक्ष कुठलाही असो सर्व पक्षातील नेते आणि कार्यकर्त्यांबरोबर त्यांचे संबंध चांगलेच राहिले. प्रत्येकाशी त्यांनी आत्मियता ठेवल्याने त्यांच्या मुलाच्या विवाहप्रसंगी अनेकांनी शुभेच्छा दिल्या.

सोशल मिडीयावरुन दहशत निर्माण करणाऱ्या पोस्ट व्हायरल केल्यास अथवा फॉरवर्ड केल्यास होणार कारवाई

पोलीस अधिक्षक बीड यांच्याकडून जनतेला आवाहन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी जिल्हयातील सर्व जनतेला आवाहन केले आहे की, कोणीही मोबाईल व इंटरनेटचा वापर करुन आपल्याकडे असलेले वैध अथवा अवैध शस्त्राचे (फोटो/व्हीडीओ) सोशल मिडीयाव्दारे प्रदर्शित करु नये. तसेच एखाद्या मारामारीच्या घटनेतील रेकॉर्ड केलेला फोटो व्हीडीओ, शिव्या देतांनाचा व्हिडीओ अथवा समाजात दहशत किंवा भिती निर्माण होईल अशी कोणतीही पोस्ट कोणत्याही सोशल मिडीया अकाउंटवरुन शेअर करु नये, अथवा फॉरवर्ड करु नये. तसेच

ज्यांनी कोणी यापुर्वी अशा प्रकारच्या पोस्ट सोशल मिडीयाव्दारे प्रदर्शित केल्या असतील/शेअर केल्या असतील किंवा फॉरवर्ड केल्या असतील त्या त्यांनी तात्काळ सोशल मिडीयावरुन डिलिट कराव्यात. समाज माध्यमांवर (सोशल मिडीया) अशा प्रकारे कोणीही शस्त्राचे, मारामारीचे अथवा शिवीगाळ केल्याचे किंवा ज्यामुळे समाजात भिती व दहशत निर्माण होईल असे फोटो व्हीडीओ प्रदर्शित करील, लाईक करील किंवा फॉरवर्ड करील तसेच ज्यांनी कोणी यापुर्वी सोशल मिडीयावरुन अशा पोस्ट केल्या आहेत. परंतू आम्ही दिलेल्या सुचनेनंतरही त्या पोस्ट डिलिट केल्या नाहीत. तर अशा व्यक्तींविरुध्द तात्काळ भारतीय न्याय संहिता, माहिती तंत्रज्ञान अधिनियम तसेच इतर कायद्यान्वये योग्य ती कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल असा इशारा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी दिला आहे.

दत्तधाम मधील श्रीदत्त मूर्तीची हजारो भाविकांच्या उपस्थितीत प्राणप्रतिष्ठा

बीड । प्रतिनिधी

शहरातील फुलाईनगर भागात गुरुवार दि २६ रोजी श्री.दत्त मुर्तीची प्राणप्रतिष्ठा विधिवत करण्यात आली, यावेळी भाविक दत्तभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. या दत्तधाम परिसरातील मंदिराचे बांधकाम भाविकांनी स्वयंप्रेरणेने हाती घेतले होते यात मंदिर आणि मुख्य गाभाऱ्याचे काम पूर्ण झाल्यानंतर प्राणप्रतिष्ठा करण्यात आली, त्याआधी दि २५ रोजी श्रीदत्त मूर्तीची भव्य शोभायात्रा काढण्यात आली या शोभायात्रेत परिसरातील सारे परिवार सहभागी झाले होते. दि २६ रोजी विधिवत प्राणप्रतिष्ठा हजारो भाविकांच्या उपस्थितीत आणि सद्गुरू साडेगावकर महाराज यांच्या हस्ते करण्यात आली,तसेच दि २७ रोजी महाप्रसाद आयोजित करण्यात आला होता तिन्ही दिवशी भाविकांनी मोठया प्रमाणावर उपस्थिती लावली होती.

बीड शहरातील फुलाई नगर गुरुप्रसाद कॉलनी एकता नगर व्यंकटेश कॉलनी येथील भाविक भक्तांच्या सहकार्याने भव्य आणि दिव्य श्रीदत्त मंदिराचे काम सुरू असून सध्या गाभाऱ्याचे काम पूर्ण झाले आहे अत्यंत सुंदर आणि मनमोहक अशी दत्तमूर्ती देखील आणण्यात आली, दिनांक २५ रोजी दुपारी चार वाजता भगवान दत्तात्रयाच्या मूर्तीची शोभायात्रा काढण्यात आली,आणि

दिनांक २६ गुरुवार रोजी सकाळी आठ वाजता यजमान पत्रकार प्रशांत सुलाखे,उद्योजक अतुल संघांनी,शामसेठ क्षीरसागर,संतोष कुलकर्णी, योगेश खडके यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा सोहळा पार पडला,या सोहळ्यासाठी श्रीसमर्थ संस्थान साडे भोगलगाव येथील सद्गुरू सुरेश महाराज रामदासी यांची प्रमुख उपस्थिती होती,सायंकाळी चार वाजता प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर दर्शन सोहळा आयोजित करण्यात आला होता तर रात्री ८ ते १० या वेळेत नादब्रह्मच्या स्थानिक कलाकारांचा गुरुवार पंचपदी आणि भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला,दिनांक २७ रोजी याच भागात असलेल्या संदीप कुलकर्णी यांच्या

वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते,या तीनही दिवसात दत्त भक्तांनी मोठी गर्दी केली होती. प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमाचे पौरोहित्य संतोष रत्नपारखी, जीवन पाठक, संतोष कुरलेकर,अनिकेत दाणी,सिद्धेश जोशी,आणि केशव पाठक यांनी केले,यावेळी विधिवत कार्यक्रमात प्रायश्चित्त संकल्प,प्रधान संकल्प,गणपती पूजन, मातृका पूजन,नांदीश्राद्ध,देवता स्थापन,अग्निस्थापन,मूर्ती जलाधिवास,नवग्रह हवण, स्नपण,तत्वन्यास,शय्याधिवास,मूर्तीप्राणप्रतिष्ठा,बलिदान पूजन करण्यात आले यावेळी हजारो भाविक उपस्थित होते,परिसरात एकमेव दत्तमंदिर झाल्याने दर्शनासाठी भाविकांची गर्दी वाढू लागली आहे.

पान ६ वरून...

योगेश्वरी देवी मंदिर

आहे. अशा अनेक तक्रारी सुजाण नागरिक व पालकांनी आमच्या पक्षाकडे तोंडी स्वरूपात केल्या आहेत. म्हणून अशा रोड रोमियो आणि गुंड प्रवृत्तीच्या युवकांचा तात्काळ बंदोबस्त करणे आवश्यक आहे. यासाठी अंबाजोगाई शहरात दामिनी पथकाची नेमणूक करावी. याबाबत अंबाजोगाई शहर व ग्रामीण पोलिस निरीक्षकांना आदेशीत करावे अशी विनंती व मागणी करण्यात आली आहे. याप्रकरणी पोलिस प्रशासनाने कोणतीही कारवाई केली नाही तर समाजवादी पार्टीच्या वतीने उपोषण करण्यात येईल असा इशारा ही या निवेदनातून देण्यात आला आहे. सदरील निवेदनावर समाजवादी पार्टी महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सालेहा जिलानी शेख, समाजवादी पार्टीचे जिल्हाध्यक्ष मोहम्मद खमरूल ईमान खान, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष जिलानी शेख आणि अंबाजोगाई शहराध्यक्ष राजेश मातादीन परदेशी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

गंगाई- बाबाजी राज्यस्तरीय

भगवान महाविद्यालय, आष्टी येथे सादर करावेत, असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आलेले आहे. या संदर्भातील अधिक माहितीसाठी आपण डॉ.दत्तात्रय वाघ (प्राचार्य-९४२३७१६८५२), डॉ. ज्ञानदेव वैद्य (उपप्राचार्य-९४२३७१६८५९) व डॉ. आप्पासाहेब टाळके (उपप्राचार्य-९४२१४४३५९०) व डॉ.आबासाहेब पोकळे (९७६३४३४५४६)यांच्याशी संपर्क साधावा असे महाविद्यालयाच्या वतीने कळविण्यात आलेले आहे.

अंबाजोगाईत रोटरी

रमेश देशमुख,यांची उपस्थिती होती.शहरातील गुरुदेव विद्यालय, बालनिकेतन, खोलेश्वर विद्यालय, वेणूताई चव्हाण कन्या विद्यालय,डॉ.राम भालचंद्र विद्यालय,संकल्प विद्यालय,कर्तव्य कर्णबधीर मुलींचे विद्यालय, डॉ.महमद इकबाल विद्यालय या सर्व शाळांमधे २४०० विद्यार्थ्यांची दंत तपासणी करण्यात आली. या उपक्रमात डॉ. हर्षा काळे,डॉ. प्रवीण जोशी,डॉ. उदय सोनी,डॉ.शुभांगी चव्हाण,डॉ.ऋषिकेश घुले,डॉ.अश्विनी घुले,डॉ.शीतल सोनवणे,डॉ.मंगल बाहेती,डॉ.सुजाता डोंगरे,डॉ.पूजा कुंडगिर,डॉ.श्वेता मुंडे,डॉ.दिपाली गिराम,डॉ.अंजली रेड्डी,डॉ.पूनम घुले,डॉ.पूजा लोमटे यांनी तपासणी करून आपला सहभाग नोंदविला. या दंत शिबिराच्या यशस्वितेसाठी रोट्रॅक्ट क्लबचे जतिन कर्णावट,रमन भन्साळी,सुशील गिल्डा,सर्वेश बजाज,संदीप जाधव,सुशील गंगणे, मयूर परदेशी,सूशाल मारू,नेहा जैन यांनी परिश्रम घेतले.

दूषित पाण्यामुळे दात किडन्याचे प्रकार वाढले

आज झालेल्या दंत तपासणी शिबिरात विद्यार्थ्यांची तपासणी झाली. या तपासणीत प्रामुख्याने अनेक विद्यार्थ्यांच्या दातांवर लाल व पांढरे डाग अढळून आले. पिण्याच्या पाण्यातील क्लोराईडचे वाढते प्रमाण व दूषित पाणी यामुळे हा आजार उद्भवतो.

-डॉ.अश्विनी घुले,दंत चिकित्सक,अंबाजोगाई

बिबट्याच्या हल्ल्यात जरेवाडीत

विजय जाधव यांनी पंचनामा केला आहे. बिबट्याच्या हल्ल्यात गाईचा व वासराचा (गोऱ्हा) मृत्यू झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे.त्यांना शासनामार्फत आर्थिक नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी होत आहे.परिसरातील डोंगरात शेत परिसरात बिबट्यांचा संचार वाढला असून शेतकरी,गुराखी यांनी रात्री-अपरात्री एकट्याने न फिरता स्वतःची काळजी घ्यावी असे आवाहन वनविभागाच्या वतीने करण्यात येत आहे.परिसरात रानडुकरांची संख्या वाढत असून रानडुकरे हाता-तोंडाशी आलेल्या पिकांची मोठ्या प्रमाणात नासाडी करीत आहेत.तर बिबट्यासारखे वन्यप्राणी पशुधनावर हल्ला करून बळी घेत आहेत. अशा दुहेरी संकटात शेतकरी सापडला आहे. रान डुकरे व वन्यप्राण्यापासून होणाऱ्या संकटापासून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने काहीतरी ठोस उपाय योजना करून रानडुकरे व बिबट्याचा बंदोबस्त करावा अशी शेतकरी मागणी करीत आहेत.

विद्यापीठ केंद्रीय युवक

वामन धनश्री गर्जे कांचन गाडे आणि विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता छत्रपती संभाजीनगर विधानसभा निवडणुकात गाजलेल्या लाडकी बहिणी योजना आणि एक हे तो सेफ है याचा प्रभाव विद्यापीठाच्या केंद्रीय युवा महोत्सवातही दिसला विद्यापीठाच्या वतीने आयोजित चार दिवसीय केंद्रीय युवा महोत्सवास बुधवारपासून सुरुवात झाली सकाळी नऊ वाजता विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्णाकृती पुतळ्यापासून शोभायात्रेला सुरुवात झाली याचे उद्घाटन मनपा आयुक्त जी श्रीकांत यांच्या हस्ते झाले मराठवाड्यातील महाविद्यालयांनी विविध कला सादर करून रसिक प्रेक्षकांचे मनोरंजन केले तसेच प्रबोधनही केले हा युवा महोत्सव २५ डिसेंबर ते २८ डिसेंबर पर्यंत सुरू आहे

मानवी जीवनाच्या सर्वांगीण

शास्त्राची भूमिका जीवनात परिवर्तन घडवते सामाजिक शास्त्राचे स्वरूप सांगितले या कार्यक्रमासाठी समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ सुनील जाधव अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ शिवाजीराव काकडे राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ लोखंडे बी बी इतिहास विभाग प्रमुख प्राध्यापक घाडगे लोकप्रशासन विभाग कल्पना घारगे व्यासपीठावर उपस्थित होत्या या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व सामाजिक शास्त्राचे विभाग प्रमुख भाषा शास्त्राचे विभाग नाटक कार प्राध्यापक बापू घोक्षे इंग्रजी विभाग प्रमुख प्राध्यापक विनोद सर डॉ संदीप किवणे डॉ वंदन जाधव विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते स्पर्धा परीक्षेसाठी मुलांना व मुलींना महाविद्यालयात स्पर्धा मार्गदर्शन केंद्र उपलब्ध करून देण्यात आली याचा लाभ घेण्याचे आव्हान प्राचार्य डॉक्टर विश्वास कदम यांनी केले या कार्यक्रमाचे आभार प्राध्यापक शिवाजीराव भोरे यांनी मांडले तर कार्यक्रमाची शानदार सूत्रसंचालन अशोक देवगुडे यांनी केले या कार्यक्रमासाठी कनिष्ठ विभागाचे विभाग प्रमुख प्राध्यापक सतीश जरांगे सर प्राध्यापक बाळासाहेब जोशी प्राध्यापक बजरंग दिसले प्राध्यापक डोंगरे सर प्राध्यापक डॉ गोविंदराव बाम दळे शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले भारताचे माजी पंतप्रधान अर्थतज्ञ डॉक्टर मनमोहन सिंग यांना भावपूर्ण आदरांजली महाविद्यालयाच्या वतीने वाहण्यात आली.

शेतकरी २०१७ च्या कर्जमाफीपासून अद्याप वंचित

सरकारकडून दिलासा मिळण्याची अपेक्षा

पुणे : शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या हेतूने तत्कालीन राज्य सरकारने सन २०१७ मध्ये कर्जमाफीची घोषणा केली होती. या योजनाचा गाजावाजा करीत लाभार्थ्यांना जिल्हा प्रशासनाने प्रमाणपत्र वाटपाचा कार्यक्रमही घेतला होता. मात्र जिल्ह्यातील अडगाव बुद्रुक सेवा सहकारी सोसायटीचे सुमारे २४८ पात्र शेतकरी अद्यापही कर्जमाफीच्या लाभापासून वंचित असून, त्यांची मागणी पूर्ण झालेली नाही. राज्यात हाच आकडा सहा लाखांवर आहे.

सन २०१७ मध्ये जून महिन्यात तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांसाठी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान कर्जमाफी योजना जाहीर केली होती. या कर्जमाफीत तेव्हापासून आजवर म्हणजेच सात वर्षांनंतरही सहा लाख ५६ हजार पात्र शेतकरी कर्जमाफीपासून वंचित आहेत. ही योजना जाहीर केल्यावर १८ ऑक्टोबर २०१७ ला धनत्रयोदशीच्या दिवशी महाराष्ट्रातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात तत्कालीन पालकमंत्री

व जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते तर मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते निवडक शेतकऱ्यांना साडीचोळी व आपण कर्जमुक्त झालात असे मुख्यमंत्र्यांच्या सहीचे प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले गेले होते. हे शेतकरीसुद्धा साडेसात वर्षांनंतरही कर्जमाफीपासून वंचित आहेत. या बाबत संबंधित विभागाने शासनाकडे पाठपुरावा निधीची मागणी केली. परंतु शासनाने तरतूद केली नसल्याने विषय रेंगाळलेला आहे. या वेळी हिवाळी अधिवेशनात तरी मागण्या पूर्ण केल्या जाईल असे वाटत होते. मात्र पुरवणी मागण्यांमध्ये कर्जमाफीला स्थान नसल्याने शेतकरी साशंक झाले आहेत. यापूर्वी हा विषय विविध आमदारांनी लक्षवेधी, विशेष उल्लेख, औचित्याचा मुद्दा, अंतिम आठवडा प्रस्ताव व इतर प्रकारात मांडत शासनाच्या लक्षात आणून दिला होता. मात्र या विषयावर तोडगा काढल्या गेला नाही. कर्जमाफीपासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांची कर्जमाफी न होणे, कर्ज थकित राहणे, नीलचा दाखला न मिळणे अशा अडचणी बनल्या आहेत. गेल्या सात वर्षांपासून त्यांना कोणत्याच बँकेने वा सोसायटीने कर्जपुरवठा केलेला नाही. हा शेतकरी वर्ग आर्थिकदृष्ट्या हवालदिल झालेला आहे. सन २०२३ च्या हिवाळी अधिवेशनात तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावर बोलताना सॉफ्टवेअरची त्रुटी निर्माण झाल्याने साडेसहा लाख शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहलेले आहेत.

देशी गायींसाठी लवकरच विशेष दुग्धशाळा - गोसेवा आयोग अध्यक्ष शेखर मुंदडा

नाशिक : गोमातेचे संवर्धन करणे हीच गोसेवा आयोगाची प्राथमिकता असून, राज्यात गो-साक्षरता आणि गो-पर्यटन या माध्यमातून गायींच्या संवर्धनाचे काम करण्यात बरोबरच राज्यात देशी गायींसाठी विशेष दुग्धशाळा निर्माण करण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी दिली.

गोमातेचे संवर्धन करणे हीच गोसेवा आयोगाची प्राथमिकता असून, राज्यात गो-साक्षरता आणि गो-पर्यटन या माध्यमातून गायींच्या संवर्धनाचे काम करण्यात बरोबरच राज्यात देशी गायींसाठी विशेष दुग्धशाळा निर्माण करण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी दिली. महाराष्ट्र गोसेवा समितीचे अध्यक्ष शेखर मुंदडा सदिच्छा भेटीसाठी आले असता या वेळी संवाद मेळावा घेण्यात आला. डॉ.मधुकर आचार्य अध्यक्षस्थानी होते. ॲड. गोरक्षनाथ चौधरी, आयोगाचे सदस्य वर्मा, दुर्गेश दायमा आदींची प्रमुख उपस्थिती होती. गोमातेचे संरक्षण संवर्धन व संगोपन या आयोगाच्या संकल्पना आहेत. गोमातेस राज्यमातेचा दर्जा देणारे भारतातील महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. गोमातेचे संरक्षण ही सर्वांची सामुदायिक जबाबदारी आहे. समर्पण असल्याखेरीज काहीही मिळत नाही. गोरक्षण ही आपली जबाबदारी आहे. गोरक्षेसाठी येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी राज्य गोसेवा आयोग सहकार्य करेल, अशी ग्वाही मुंदडा यांनी दिली.

सात-बारा कोरा करण्याचे आश्वासन पूर्ण करा अन्यथा; राजू शेट्टींचा सरकारला इशारा

पुणे : विधानसभा निवडणुकीत महायुती सरकारने शेतकऱ्यांचा सात-बारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते. त्याची पूर्तता राज्य सरकारने तातडीने करावी. यासाठी राज्यातील जिल्हाधिकाऱ्यांना स्वाभिमानी शेतकरी संघटनेकडून १ जानेवारीला निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती शेतकरी नेते माजी खासदार राजू शेट्टी यांनी दिली. संघटनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची पुणे येथे गुरूवारी बैठक झाली, तिथे निर्णय झाल्याचे सांगण्यात आले.

शेट्टी यांनी दिलेल्या माहितीनुसार, ''उत्पादन खर्चापेक्षा कमी किमतीत शेतकऱ्यांना शेतमाल विकावा लागत आहे. रासायनिक खतांच्या किमतीत भरमसाठ वाढ झालेली आहे. डी.ए.पी. खताच्या दरात पुन्हा २५० रुपयांची वाढ झाली. कीटनाशके, तणनाशकांच्या किमतीत वाढ झालेली आहे. सरकार हमीभाव जाहीर करते. हमीभावाचा कायदा अस्तित्वात नसल्याने शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी किमतीत शेतीमाल विकावा लागत आहे.'' असे शेट्टी म्हणाले. माजी खासदार शेट्टी म्हणाले ''परिणामी पाच वर्षांत शेतकऱ्यांचे कर्ज दुप्पट झाले आहे. एका बाजूला केंद्र सरकार

कार्पोरेट कंपन्यांचे दहा लाख कोटींच्या कर्जाचा निर्णय घेत नाही. ते कर्ज राईट ऑफ करत आहे. दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांचे कर्ज दुप्पट होते. हे दुर्दैवी आहे. महायुती सरकारला शेतकऱ्यांनी भरभरून मते दिलेली आहेत. राज्यात रामराज्य आल्याचे महायुतीचे नेते सांगत आहेत. सरकारने दिलेला शब्द पाळावा म्हणून राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी, शेतकरी १ जानेवारीला जाऊन सरकराने दिलेल्या शब्दांची आठवण करून देतील.'' अशी माहिती शेट्टी यांनी दिली. मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन मी स्वतः याबाबत आठवण करून देणार आहे. त्यानंतरही सरकराने आमची दखल घेतलेली नाही, तर राज्यव्यापी मोठ्या आंदोलनाची घोषणा केली जाईल, असा इशारा शेट्टी यांनी दिला.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

१८४५ : टेक्सास हे अमेरिकेचे २८ वे राज्य बनले.
१९३० : सर मुहम्मद इकबाल यांनी दोन राष्ट्र सिद्धांत तसेच पाकिस्तानच्या निर्मितीचा दृष्टीकोन मांडला.
१९५९ : नोबेल पारितोषिक विजेते रिचर्ड फाइनमॅन यांनी येथे हे प्रसिद्ध भाषण दिले. ही ची सुरुवात मानली जाते.
१९५९ : पोर्तुगालमधील लिस्बन येथे भुयारी रेल्वेची सुरूवात झाली.
१९७२ : कोलकता मध्ये मेट्रो रेल्वे च्या कामाला आजच्या दिवशी सुरुवात.
१९८३ : भारतीय क्रिकेटर सुनील गावस्कर यांनी वेस्ट इंडीस विरुद्ध २३६ रन बनविले, तेव्हा हा स्कोर कसोटी सामन्यामधील सर्वात जास्त होता.
२००६ : चीन ने राष्ट्रीय सुरक्षेसाठी श्वेत पत्र जारी केले.
२०१२ : पाकिस्तान मध्ये पेशावर जवळ आतंकवादी हल्यात २१ सुरक्षाकर्मी मरण पावले.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८०० : चार्ल्स गुडईयर रबरावरील व्हल्कनायझेशन ही प्रक्रिया शोधणारे अमेरिकन संशोधक (मृत्यू: १ जुलै १८६०)
१८०८ : अँड्रू जॉन्सन अमेरिकेचे १७ वे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: ३१ जुलै १८७५)
१८०९ : ब्रिटीश पंतप्रधान विल्यम ग्लॅडस्टोन यांचा जन्म.
१८४४ : काँग्रेसचे पहिले अध्यक्ष व्योमकेशचंद्र बनर्जी यांचा जन्म.
१९०० : मास्टर दीनानाथ मंगेशकर शास्त्रीय व नाट्यसंगीत गायक व अभिनेते (मृत्यू: २४ एप्रिल १९४२)
१९०४ : कुपल्ली वेंकटप्पागौडा पुट्टप्पा उर्फ 'कुवेम्पू' ज्ञानपीठ विजेते कन्नड लेखक व कवी (मृत्यू: ११ नोव्हेंबर १९९४)
१९१७ : रामानंद सागर हिन्दी चित्रपट निर्माते (मृत्यू: १२ डिसेंबर २००५)
१९२१ : फेडरल रिपब्लिक ऑफ युगोस्लाव्हियाचे पहिले अध्यक्ष डोब्रिका कोसिक यांचा जन्म. (मृत्यू: १८ मे २०१४)
१९४२ : राजेश खन्ना चित्रपट अभिनेते, निर्माते आणि राज्यसभेचे सदस्य (मृत्यू: १८ जुलै २०१२)
१९७४ : अभिनेत्री ट्विंकल खन्ना यांचा जन्म.
१९६० : ओस्ट्रेलियन क्रिकेटपटू डेव्हिड बून यांचा जन्म.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९६७ : पण्डित ओंकारनाथ ठाकूर ऊर्फ 'प्रणव रंग' गायक व संगीत अभ्यासक, १९५५ मधे पद्मश्री पुरस्काराने सन्मानित (जन्म: २४ जून १८९७)
१९७१ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सहकारी दादासाहेब गायकवाड यांचे निधन.
१९८० : भारतीय चित्रपट निर्माते नंदुभाई वकील यांचे निधन.
१९८६ : हॅरॉल्ड मॅकमिलन इंग्लंडचे पंतप्रधान (जन्म: १० फेब्रुवारी १८९४)
२००८ : प्रसिद्ध चित्रकार मंजीत बावा यांचे निधन.
२०१२ : टोनी ग्रेग इंग्लिश क्रिकेटपटू व समालोचक (जन्म: ६ आक्टोबर १९४६)
२०१३ : भारतीय लेखक आणि अनुवादक जगदीश मोहंती यांचे निधन. (जन्म: १७ फेब्रुवारी १९५१)
२०१४ : भारतीय-हाँगकाँगचे व्यापारी हरी हरिलेला यांचे निधन. (जन्म: १० ऑगस्ट १९२२)
२०१५ : पंजाबचे २५ वे राज्यपाल ओमप्रकाश मल्होत्रा यांचे निधन. (जन्म: ६ ऑगस्ट १९२२)

संत्रा, मोसंबी बागेचे आंबिय बहार व्यवस्थापन

थंडी संपतेवेळी येणाऱ्या आंबिया बहाराचे व्यवस्थापन करण्यासाठी बागेची खालीलप्रकारे निगा राखावी. शास्त्रीय दृष्टीने निगा राखल्यास संत्रा/मोसंबी बागेपासून आर्थिक उत्पादन मिळवता येते.

संत्रा/मोसंबीचे बहार

निसर्गतः संत्रा/मोसंबी फळझाडास वर्षातून तीनदा बहार येतो. त्यापैकी पावसाळ्यात (जून-जुलै) येणाऱ्या बहारास ''मृग बहार (मृग नक्षत्रात येणारा) आणि पावसाळा संपल्यानंतर (ऑक्टोबरमध्ये) येणाऱ्या बहारास ''हस्त बहार (हस्त नक्षत्रात येणारा) तर थंडी संपतेवेळी (जानेवारी-फेब्रुवारी) म्हणजे आंब्याला ज्या वेळी बहार येतो तो ''आंबिया बहार असे तीन बहार वेगवेगळ्या ऋतूंमध्ये येतात.

संत्रा/मोसंबीचा आंबिया बहार

संत्रा/ मोसंबीची झाडे निसर्गतः थंडीच्या आणि उन्हाळ्याच्या दिवसात कमी-जास्त तापमानामुळे दोनदा विश्रांती घेत असतात. साधारणतः या काळात वातावरण पोषक नसते. झाडांवर नवीन वाढ होत नाही. त्यामुळे या विश्रांतीच्या काळात अतिरिक्त शर्करेचा संचय झाडाच्या ६ ते ९ महिन्यांच्या फांद्यांमध्ये होतो. हवामान अनुकूल झाल्यावर झाडावर फुले येण्यास याचा उपयोग होतो. संत्रा-मोसंबीच्या आंबिया बहाराला नैसर्गिक बहार म्हणतात. या बहारामध्ये संत्रा-मोसंबी झाडाची वाढ कडाक्याच्या थंडीत थांबते. डिसेंबरचा दुसरा आठवडा ते जानेवारीचा दुसरा आठवडा या एका महिन्याच्या कालावधीत रात्रीचे किमान तापमान साधारणतः १० अंश सें. खाली राहते. एवढ्या तापमानावर झाडांना ताण बसतो. या ताणामुळे झाडे खराब होत नाही.आंबिया बहार घेण्याकरिता संत्रा-मोसंबी झाडाला ताण देणे

झाडांची सतत होणारी वाढ थांबविण्याकरिता संत्रा-मोसंबी झाडाला पाण्याचा पुरवठा बंद करणे, म्हणजे झाडांना ताण देणे. संत्रा-मोसंबी झाडाला पाण्याचा ताण दिल्यामुळे झाडांची वाढ थांबते. झाडे विश्रांती घेतात. त्यामुळे झाडाच्या फांद्यांत पानात अन्नद्रव्यांचा संचय होतो. आंबिया बहार घेण्याकरिता डिसेंबर महिन्याचा दुसरा आठवडा ते जानेवारीचा दुसरा आठवडा या कालावधीत संत्रा-मोसंबी बागेचे ओलित बंद केले जाते. या ताणाचा कालावधी जमिनीचा पोत, झाडाचे वय आणि जमिनीमध्ये उपलब्ध असलेला ओलावा यावर अवलंबून आहे. आंबिया बहारासाठी हलक्या जमिनीत ३५ ते ४५ दिवस, मध्यम जमिनीत ४५-६० दिवस आणि भारी जमिनीत ५५ ते ७५ दिवस ताण द्यावा.

भारी जमिनीत आंबिया बहार घेण्यासाठी काय करावे?

काळ्या जमिनीचा थर किमान १.२० मी पासून १५ मीटरपर्यंत असतो. या जमिनीत ताणावर झाडे सोडताच झाडाच्या मुळ्या पाण्याच्या शोधात खोलवर जातात. मुळात काळी जमीन उत्तम ओलावा टिकवून ठेवणारी असल्यामुळे झाडांना ओलावा मिळत राहतो व झाडाला ताण बसत नाही. अशा जमिनीत बगिचा संपूर्ण ऑक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यात, वखरून साफ ठेवावा. डिसेंबरच्या १५ तारखेच्या आसपास झाडांच्या ओळींमधून लाकडी नांगराने नांगरून झाडाच्या मुळ्या उघड्या कराव्यात. टोकावरची तंतूमुळे तुटून त्या ओलावा घेऊ शकणार नाहीत. परिणामी झाडे ताण घेतील. तसेच २ मि.लि. क्लोरमेक्वाट क्लोराईड प्रतिलिटर पाण्यात मिसळून फवारावे. हे कायिक वाढ रोखणारे संजीवक आहे.

आंबिया बहार घेण्याकरिता खताचे नियोजन

डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापासून ताणावर सोडल्यानंतर त्वरीत प्रत्येक झाडाला ४० ते ५० किलो शेणखत टाकून आडवी आणि उभी वखरण करावी. जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात किंवा तापमान वाढताच हलके ओलित करावे. ताण तोडतांना हलक्या ओलिताअगोदर प्रत्येक झाडाला ६०० ग्रॅम नत्र + ४०० ग्रॅम स्फुरद + ४०० पालाश आणि भरखते द्यावीत, त्यानंतर पाच ते सात दिवसांनी दुसरे पाणी (चिंबवणी) द्यावे. तिसऱ्या पाळीला भरपूर पाणी द्यावे. ताण सोडल्यावर २० ते २५ दिवसांनी फुले येतात. त्यानंतर उरलेल्या नत्राचा (अर्धा) हप्ता एक ते दीड महिन्याने किंवा फळे वाटाण्याएवढी झाल्यावर द्यावा. हलक्या जमिनीत नत्राची मात्रा तीन ते चार हप्त्यात विभागून दिल्यास जास्त फायदेशीर ठरते.

ओलित व्यवस्थापन : आंबिया बहाराची फळे उन्हाळ्यात झाडावर पोसली जातात त्यामुळे पाण्याचा साठा उन्हाळ्यात उपलब्ध असणे जरुरी आहे. जमिनीतील ओलावा कमी झाल्यास फळगळ होते व फळांची प्रत खालावते म्हणून आंबिया बहार घेतांना ओलिताकडे कटाक्षाने लक्ष देणे जरुरीचे आहे. ओलितासाठी ठिबक पद्धतीचा अवलंब केल्यास पाण्याची बचत होते. जमिनीच्या पोताप्रमाणे पाण्याच्या पाळ्या द्याव्यात.

थंडीत केळी पिकावरील करपा रोग नियंत्रण

थंडीमुळे केळी पिकावर करपा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. कडाक्याची थंडी केळी वरील करपा रोगासाठी पोषक असून अशा वातावरणात केळीच्या बागांवर करपाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या केळीच्या बागांची विशेष काळजी घेणे महत्वाचे आहे. हा रोग सरकोस्पोरा मुसी बुरशीमुळे होतो. रोगाचे प्रमुख लक्षण म्हणजे केळीच्या खालील ४ ते ५ पानांवर सुरुवातीला लहान-लहान पिवळसर लंबगोलाकार ठिपके पडतात. हे ठिपके मोठे होऊन आतील भाग तपकिरी काळपट रंगाचा होतो.

करपा हा उत्पन्नावर विपरीत परिणाम करणारा रोग आहे. थंडीच्या वातावरणात केळीवर करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.या रोगामुळे एकुण उत्पादनावर परिणाम होवून मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असते.यासाठी याची वेळीच काळजी घेण्याची आवश्यकता असते.

करपा रोगास कारणे : पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा न होणे. रोगग्रस्त बागेतील कंदांचा वापर होणे. शिफारशीपेक्षा कमी अंतरावर लागवड. बागेमध्ये व सभोवताली सर्वसाधारण स्वच्छतेचा अभाव. प्रतिबंधात्मक : लागवड, ओढे, नदीकाठावरील चिबड जमिनीत करु नये. कंदापासून लागवड करताना वापरण्यात येणाऱ्या मुनव्याचे वय ३ ते ४ महिन्यांचे असावे. त्याची पाने तलवारीच्या पात्यासारखी अरुंद असावीत. कंद रोगमुक्त मुनव्यापासून काढलेला असावा.

लागवड शिफारशीत अंतरावर (१.५ मी. १.५ मी.) किंवा जमिनीच्या मगदुराप्रमाणे करावी. लागवडीपूर्वी कंद प्रक्रियाः १०० ग्रॅम कार्बेन्डाझिम अधिक १५० ग्रॅम ॲसिफेट प्रति १०० लिटर पाण्यात द्रावण करुन त्यात कंद किमान अर्धा तास बुडवून ठेवावेत. शिफारशीत खत मात्रांचा अवलंब : २०० ग्रॅम नत्र, १६० ग्रॅम स्फुरद, २०० ग्रॅम पालाश प्रतिझाड अशी खतमात्रा वेळापत्रकानुसार द्यावी. बागेतील वाळलेली, पिवळी, रोगग्रस्त पाने तसेच झाडालगतची पिले नियमित कापावीत. वाळलेली, पिवळी, रोगग्रस्त पाने बागेबाहेर विल्हेवाट लावून बाग स्वच्छ ठेवावा. बागेमधील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्यासाठी चर काढावा. बाग नेहमी वाफसा स्थितीत राहील याची काळजी घ्यावी. ठिबक सिंचनाचा वापर करावा. बागेत खेळती हवा राहील अशी व्यवस्था करावी. रासायनिक खतांबरोबरच प्रति झाड १० किलो शेणखत, १५ ग्रॅम अझोस्पिरीलम आणि २५ ग्रॅम स्फुरद विरघळविणारे जीवाणू संवर्धक जमिनीत मिसळून द्यावे.

नियंत्रण : रासायनिक फवारणी (प्रतिलिटर पाणी) कार्बेन्डाझिम १ ग्रॅम अधिक मिनरल ऑईल १० मि.लि. अधिक सर्फेक्टंट १ मि. लि. प्रतिलिटर पाणी. दुसरी फवारणी १५ दिवसांनी करावी यासाठी प्रोपीकोनॅझोल १ मि.लि. अधिक मिनरल ऑईल १० मि.लि. अधिक सर्फेक्टंट १ मि.लि. प्रतिलिटर पाणी.

मुलांना चांगल्या आणि वाईट स्पर्शाबद्दल शिकवणे आवश्यक- मिनाक्षी देवकते

छत्रपती शाहू माध्यमिक विद्यालयात गुड टच-बॅड टच प्रशिक्षण शिबिर

बीड । प्रतिनिधी

वयात येत असलेल्या मुलींना काही गोष्टी सांगणे आवश्यक आहे. कोणता माणूस कोणत्या हेतूने त्यांना स्पर्श करत आहे, हे त्यांना समजले पाहिजे. चांगल्या आणि वाईट स्पर्शाबद्दल शिकवणे ही पालकत्वाची आणि शिक्षणाची एक आवश्यक बाब आहे असे प्रतिपादन बाणाई महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा मिनाक्षीताई देवकते (डोमाळे) यांनी केले.

बाणाई महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व जय वैष्णवी सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील छत्रपती शाहू माध्यमिक विद्यालयात इयत्ता ५ वी ते १० च्या विद्यार्थीनींना गुड टच-बॅड टच प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण शिबीरात कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एपीआय तथा दामिनी भरोसा सेलच्या वर्षा व्हगाडे या होत्या तर प्रमुख पाहुणे बालहक्क संरक्षण आयोगाच्या सदस्या ॲड.प्रज्ञाताई खोसरे, पोलीस हवालदार अनुराधा गव्हाणे, दामिनी पथकाच्या शोभा जाधव, मुख्याध्यापक राऊतमारे सर, ॲड.प्रशांत देशपांडे, संपादक बाळासाहेब फपाळ यांची उपस्थिती होती.

गुड टच - बॅड टच विषयी विद्यार्थीनींना प्रशिक्षण देतांना मिनाक्षीताई देवकते यांनी सांगितले की, तुमच्या परवानगी शिवाय तुमच्या शरीराला कोणी स्पर्श करू शकणार नाही. कोणत्याही स्पर्शाला नाही म्हणण्याचा अधिकार हा तुम्हाला आहे. सगळ्यात आधी मुलींना किंवा मुलाला हे सांगा की, जर एखाद्या व्यक्तीने केलेला स्पर्श तुम्हाला आवडला नाही तर त्याला बॅड टच म्हणतात. उदाहरणार्थ, जर एखादी व्यक्ती तुमच्या प्रायव्हेट पार्ट्सला चुकीच्या पद्धतीने हात लावत असेल तर तो बॅड टच आहे. एखादी व्यक्ती तुम्हाला प्रेमापोटी स्पर्श करत असेल किंवा डोक्यावर प्रेमाने हात फिरवत असेल किंवा आजी आजोबा जवळ घेतात तसे प्रेमाने गळाभेट घेत असेल तर त्याला गुड टच मानले जाते. एखाद्याने प्रेमाने काही खायला दिले किंवा एखादी आवडती गोष्ट दिली तर मुले किंवा मुली लगेच आनंदी होतात. तुमच्या या भुलण्याचा इतर लोक गैरफायदा घेऊ शकतात, हे समजावून सांगणे ही पाल्यांची जबाबदारी आहे. मुलींना सांगा की, जर एखाद्या बाहेरच्या किंवा अज्ञात व्यक्तीने एखादी गोष्ट देऊन किंवा तुम्हाला एखादे मोठे आश्वासन देऊन फसवण्याचा प्रयत्न केला तर अशावेळी जागरुक राहा. बाणाई महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्यावतीने जिल्ह्यातील तसेच राज्यातील विविध शाळेत अशा प्रकारची प्रशिक्षण शिबीरे घेणार असल्याचे सांगून मिनाक्षीताई देवकते (डोमाळे) यांनी विद्यार्थीनींना चांगला स्पर्श व वाईट स्पर्श हे प्रात्यक्षिकासह समजावून सांगितला या प्रशिक्षण शिबीरास शाळेच्या सहशिक्षिका गायकवाड व्ही.एम., कदम पी.आर., रुपाली गायकवाड, श्रीमती मनिषा जाधव, सरवदे सर यांच्यासह शाळेतील बहुसंख्य विद्यार्थीनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. आजकाल घडणार्या वेगवेगळ्या घटनांमुळे पालकांची चिंता वाढली आहे. मुलींना घराबाहेर पाठवताना किंवा अनोळखी व्यक्तीसोबत पाठवताना पालक दहा वेळा विचार करतात. तुमच्या वयात येत असलेल्या मुलींना काही गोष्टी सांगणे आवश्यक आहे. कोणता माणूस कोणत्या हेतूने त्यांना स्पर्श करत आहे, हे त्यांना समजले पाहिजे. तुमच्या पाल्यासोबत मैत्रीचे नाते निर्माण करत तुम्ही त्यांना गुड टच आणि बॅड टचविषयीची माहिती सांगणे आवश्यक आहे. मुलींनी देखील अप्रिय घटना घडल्यास तात्काळ पोलीसांशी संपर्क साधावा असे आवाहन कार्यक्रमाच्या अध्यक्षा एपीआय तथा दामिनी भरोसा सेलच्या वर्षा व्हगाडे यांनी केले.

अनेकदा पालकांना आपल्या पाल्यांसाठी वेळ नसतो. त्यांच्यामध्ये संवाद होत नाही. त्यामुळे मुलांना किंवा मुलींना काय त्रास होतोय ते त्यांना समजत नाही. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांसोबत थोडा वेळ घालवायला हवा. त्यांच्यासोबत बोलायला हवे. मुलांना दररोज डायरीमध्ये सगळ्या गोष्टी लिहिण्याची सवय लावा. त्यांच्या भावना व्यक्त होणे आवश्यक आहे असे प्रतिपादन बालहक्क संरक्षण आयोगाच्या सदस्या ॲड.प्रज्ञाताई खोसरे यांनी केले.

होमिओपॅथी व आयुर्वेद सिद्धांत चिकित्सा रुग्णांसाठी लाभदायी-डॉ.दिपक काथवटे

बीड । प्रतिनिधी

आदर्श शिक्षण संस्थेचे सोनाजीराव क्षिरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयाच्या वतीने होमिओपॅथी प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी पायाभूत अभ्यासक्रमांर्गत होमिओपॅथी व आयुर्वेद यातील सैद्धांतिक भूमिकेचा तौलनिक अभ्यास या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेसाठी प्रवरा मेडिकल ट्रस्टचे आयुर्वेद कॉलेज शेवगाव येथील डॉ.प्रा.दिपक काथवटे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेंद्र गौशाल,तसेच विचार मंचावर उपप्राचार्य तथा राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.गणेश पांगारकर, फार्मसी विभाग प्रमुख डॉ.अंजली पवार उपस्थित होते. विद्यार्थ्यांस मार्गदर्शन करताना डॉ. दिपक काथवटे म्हणाले की,भगवंत धन्वंतरी यांनी निसर्गातील असणाऱ्या औषधी वनस्पती या मानवी प्रकृतीसाठी लाभदायी असून या औषधी वनस्पतींचा शोध घेऊन आयुर्वेद चिकित्सा पद्धती विकसित केली.या चिकित्सा पद्धतीचा अनेक देशांत प्रभावीपणे वापर केला जात असल्याचे त्यांनी यावेळी म्हटले. पुढे बोलताना ते म्हणाले की, होमिओपॅथी व आयुर्वेद सिद्धांतानुसार चिकित्सेतून जुनाट व गंभीर आजारांवरही शरीरावर कोणताही अपाय न होता उपचाराने त्या आजाराचे समुळ नष्ट होते. सध्या भारतभर चालू असलेल्या प्रकृती प्रक्षणात होमिओपॅथी आयुर्वेद व निसर्गोपचार सारख्या चिकित्सा पद्धतींचा जास्तीत जास्त प्रमाणात वापर होतो.या चिकित्सा पद्धतीस राजाश्रय मिळाल्यास मोठ्या प्रमाणावर रुग्णांस अत्यल्प खर्चात प्रभावी व गुणकारी चिकित्सा पद्धती म्हणून लाभदाय ठरणार असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे संयोजन डॉ. वैभव शहापुरे यांनी केले.

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा बीड जिल्हा दौरा

बीड । प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोग येथील तरुण सरपंच संतोष देशमुख यांची निर्घुणपणे हत्या करण्यात आली असून या हत्या प्रकरणातील आरोपींना आजपर्यंत अटक करण्यात आलेली नाही. मस्साजोग येथील संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री रामदास आठवले सोमवार (ता.३०) डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता मस्साजोग येथील संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची भेट घेणार असल्याची माहिती युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांनी दिली आहे.

परभणी येथील संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना झाल्या प्रकरणी आंबेडकरी अनुयायांच्या वतीने निषेध नोंदवीत असतांना सोमनाथ सूर्यवंशी या भिमसैनिकाला पोलीसांनी अमानुषपणे मारहाण केल्यामुळे त्याचा न्यायालयीन कोठडीत मृत्यु झाला. तसेच या विटंबना प्रकरणी शांतता प्रस्थापित करण्याचे काम करणारे आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ नेते विजयदादा वाकोडे यांचे हृदय विकाराने दुःखद निधन झाले. मस्साजोग येथील संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची भेट घेऊन केंद्रीय मंत्री रामदास आठवले परभणी येथील भिमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी व ज्येष्ठ दिवंगत नेते विजय दादा वाकोडे यांच्या कुटुंबाची ३० डिसेंबर रोजी भेट घेणार असल्याची माहिती जिल्हा रिपाइंच्या वतीने युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

कोतवालांना सफाईचे काम; अधिकाऱ्यांची हुकूमशाही

जालना । प्रतिनिधी

भोकरदनचे तहसिलदार संतोष बनकर यांनी कोतवालांना सज्जेवर पाठविण्याऐवजी तहसील कार्यालयात साफ-सफाईसह रात्रपाळीची आणि आवक जावकची कामे दिली असून, शिवाय स्वतःच्या गाडीवर चालक म्हणुन २ कोतवालांची नियुक्ती केल्याची तक्रार करण्यात आली याप्रकरणी जिल्हाधिकारी कारवाई करणार का याकडे सर्वांचे लक्ष. तसेच त्याची दखल घेत निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांनी तहसीलदार आणि उपविभागीय अधिकारी यांना पत्र पाठवुन तात्काळ चौकशी करून अहवाल पाठविण्याचा कळविण्यात आले आहे

यासंदर्भात माहिती अशी की, कोतवालांना सज्जेवर पाठविण्याऐवजी साफ-सफाईसह इतर कामे दिल्याने त्याची तक्रार जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाल यांच्याकडे संबंधित प्रकाराची चौकशी करुन निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांनी मागवला अहवाल जबाबदार अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली होती.

या तक्रारीची दखल घेत निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांनी उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार या दोघांना पत्र पाठवून तक्रारीत नमूद मुद्यांच्या अनुषंगाने आवश्यक ती चौकशी करुन त्याबाबतचा आपला स्वयंस्पष्ट अभिप्रायसह तात्काळ या कार्यालयाकडे सादर करावा. तसेच या विषयात या कार्यालयाकडे वारंवार पत्र, निवेदन व तक्रारी अर्ज प्राप्त होत असल्याने या प्रकरणात विलंब होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, असेही या पत्रात म्हटले आहे. त्यामुळे आता तहसिलदार आणि उपविभागीय अधिकारी काय अहवाल देतात याकडे लक्ष लागले आहे. कोतवालांच्या सेवा तलाठी सजेवर वर्ग करण्यात याव्यात असे आदेश असताना पुर्णपणे कायद्याचा अवमान करुन वरिष्ठ कार्यालयात कोतवाल यांच्या सेवा संलग्नित करता येत नसतांनादेखील तहसीलदार मनमानी कारभार करीत आहेत.

कोतवालांना इतर कामे न देता सजेवर पाठविण्याची मागणी मान्य न झाल्यास आपण या विरोधात शेतकऱ्यांच्यावतीने आमरण उपोषण करणार असल्याचे माहिती प्राप्त होत आहे

थोडक्यात

वसंतदादा पाटील महाविद्यालयातर्फे शालेय साहित्याचे वाटप

पाटोदा । प्रतिनिधी

येथील वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातर्फे नवगण शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त २८ डिसेंबर रोजी वाघिरा स्थित ताल संगीत विद्यालय येथे शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित व महाविद्यालयाच्या समाजोत्पादक कक्षाच्या माध्यमातून हा उपक्रम उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे, ह. भ. प. गुरुवर्य केशवजी महाराज जगदाळे, कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, प्रसिद्धी विभागप्रमुख डॉ. मनोजकुमार प्रकाश, प्रा. भारत बोराडे, प्रा. विठ्ठल शिंदे, प्रा. पिंटू रोडे, प्रा. मनिषा पाडिया उपस्थित होते. याप्रसंगी प्राचार्य हांगे यांच्या हस्ते संगीत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना वह्या व पेनचे वाटप करण्यात आले.

अरूणा सूर्यवंशी यांचे निधन



युसूफवडगाव : केज तालुक्यातील युसूफवडगाव येथील युसूफवडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयच्या शिक्षिका अरूणा सुर्यवंशी (चव्हाण) यांचे आज अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. युसूफवडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात गेल्या २२ वर्षापासुन कार्यरत असणाऱ्या इंग्रजी विषयाच्या तज्ञ अध्यापिका व विद्यार्थ्यांच्या अत्यंत प्रिय असणाऱ्या सौ. अरुणा सूर्यवंशी या गेल्या काही दिवसांपासुन आजारी होत्या आणि आज त्यांचे याच अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे.त्यांच्या पश्चात मा.प्रा.दगडूसाहेब चव्हाण एक मुलगा,एक मुलगी सून,जावई असा परिवार आहे.

वसंतदादा पाटील महाविद्यालयातर्फे फळे वाटप

पाटोदा । प्रतिनिधी

येथील वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातर्फे नवगण शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त २८ डिसेंबर रोजी पोयीचा देव मांजरसुंबा स्थित महानुभव संप्रदाय आश्रम येथे फळे वाटप करण्यात आली.प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित व महाविद्यालयाच्या समाजोत्पादक कक्षाच्या माध्यमातून हा फळे वाटप करण्याचा उपक्रम उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे, प्रसिद्धी विभागप्रमुख डॉ. मनोजकुमार प्रकाश, समाजोत्पादक कक्षाचे समन्वयक प्रो. हमराज उईके, कर्मचारी कल्याण समिती सचिव डॉ. शरद पवार उपस्थित होते.

नदीवरील पूला अभावी अनेक वर्षापासुन शेतकरी त्रस्त

समस्या सोडवण्यासाठी उपजिल्हाधिकारी यांना निवेदन

शिरूर । प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील शेतक-यांच्या विविध समस्या पैकी शेतमाल ,औजारे,खते-बियाणे यांची वाहतुक करण्यासाठी शेतरस्ते उपलब्ध नसणे त्याच प्रमाणे मौ.हिवरसिंगा येथील नदी पासुन ते कुटे-बडे वस्ती दरम्यान किमान चार ठिकाणी नदीवर साधे पुल,नळकांडी पुल उभारणे अंत्यंत आवश्यक आसल्याने अनेक वर्षापासुन शेतकरी,विद्यार्थी,रूग्ण मागणी करत आहेत.परंतु प्रशासन व लोकप्रतिनिधी यांकडे दुर्लक्ष करत आहेत.

हिवरसिंगा मधील बहुतेक लोकवस्ती यामध्ये दुधाळ-देवकर,सानप,धर्मराज शिंदे-तिंकाडे वस्ती,कुटे-बडे,मुस्लीम वस्ती,खंडोबा वस्ती वरील किमान ६५% नागरिक रहिवास आसल्याने सर्व वस्ती परिसर गावापासुन अंदाजे दोन कि.मी.अंतरावर शेतीच्या सोयीनुसार वास्तव्यास आसल्याने नदी तीन-चार ठिकाणी चढ-उतारात आडवी येत

असल्याने पावसाळ्यात नदीच्या पाण्यातुन व इतर वेळी नदीच्या चढ-उतारातुन शेतमाल, औजारे, खते-बियाणे, दैनंदिन भाजीपाला यासाठी बैलगाडी,पिक अप,टेम्पो,ट्रक,ट्रॅक्टर वाहतुक साधने तसेच रूग्ण,विद्यार्थी,वृद्ध ये-जा करणे अंत्यंत त्रासदायक आसल्याने श्री.शिवराम राऊत,माऊली शिंदे,श्री.विश्वाभर शिंदे,अशोक सुभाष सानप,विजय हतागळे,राजू दुधाळ,नवनाथ बडे,प्रल्हाद सानप, श्रीधर सानप, धर्मराज शिंदे, अजाज शेख, रामेश्वर पांडुळे, अशोक कुटे, भागवत दुधाळ, शाम दुधाळ, सह येथील शेतकरी,नागरिक,ग्रामपंचायत पदाधिकारी, नदीवर किमान तीन-चार ठिकाणी पुल उभारण्यासाठी संघर्ष करत आहेत.गावाशेजारचे माजी मंत्री,विद्यमान आमदार, माजी पालकमंत्री श्री.धनंजय मुंडे साहेब यांना देखील अनेकदा निवेदने दिली आहेत परंतु अद्याप देखील पूल उभारण्याचे औदार्य दाखवण्यात न आल्याने पिडीत नागरिक प्रशासन व लोकप्रतिनिधींवर नाराज आहेत.करिता शिवश्री कृषि मंडळ हिवरसिंगा यांच्या माध्यमातून पिडीत नागरिकांच्या वतीने शिवराम राऊत यांनी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी सरांची भेट घेऊन व्यथा व्यक्त केल्या व जिल्हा नियोजन, स्थनिक विकासनिधी, जनसुविधा,अथवा इतर विकास योजनांतर्गत निधी उपलब्ध करून हिवरसिंगा नदीवरील देवकर-शिंदे-कुटे-बडे,मुस्लीम,सानप,वस्तीसाठी पुल उभारणे सहकार्य करण्यासाठी विनंती केली आहे.जिल्हा नियोजन अधिकारी व जिल्हाधिकारी सरांकडे विषय मांडून सहकार्य करण्याचे स्वामी सरांनी आश्वस्त केले आहे

मा.श्री ओ.एन. मंत्री साहेब, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज १८१९/२०२४

बालिका पांडुरंग शेळके विरूध्द निरंक

अर्जदार : १. बालिका भ्र. पांडुरंग शेळके, वय ३९ वर्षे, धंदा घरकाम, २. पांडुरंग पि. रामभाउ शेकळे वय ४३ वर्षे, धंदा शेती, दोघे रा. जुजगव्हाण, ता. जि. बीड विरुध्द निरंक

मागणी - बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत महेश पि. पांडुरंग शेळके, यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी मयत महेश पि. पांडुरंग शेळके, यांचा मृत्यु दिनांक २२/०५/२०२४ रोजी झाला आहे. यांचे मृत्यु वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत महेश पि. पांडुरंग शेळके, यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत महेश पि. पांडुरंग शेळके, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २०/१२/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दिनांक २१/०१/२०२५ आहे.

आदेशावरून
स्वाक्षरित
क.लि.

अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर, बीड

जाहीरनामा
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार आष्टी यांचे न्यायालयात
(दंड-विभाग) ता. आष्टी जि. बीड
Email ID : tahsildarasti@gmail.com
क्र.२०२४/दंड/जन्म/मृत्यू नोदणी/कावी
दूरध्वनी. क्र. (०२४४१) २८२५४२
दि. १७/१२/२०२४
जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत

जन्म आणि मृत्यू ची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये

सर्व जनतेस मौजे. जामगाव, ता. आष्टी आही. यांना जाहीर केले जाते कि अर्जदार श्री. ईश्वर भागवत देशमुख रा. जामगाव ता. आष्टी जि.बीड यांची जन्म दि. २०/०५/२००८ रोजी मौजे. जामगाव येथे झाला असून अर्जदारास सदरहू जन्माची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. करीता सदरहू अर्जदाराचे स्वतःचे कायदेशीर जन्माचे दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते कि, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत झाल्यास त्याना सदरहू अर्जदाराचे जन्माचे नोंद कायदेशीर असल्याबावतचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दि. १७/१२/२०२४ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

आदेशावरुन
स्वाक्षरीत
कार्यकारी अधिकारी तथा नायब तहसीलदार,आष्टी

जाहीरनामा
तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय,आष्टी जिल्हा बीड
दंड विभाग
दूरध्वनी. क्र. (०२४४१) २८२५४२
Email ID : tahsildarasti@gmail.com
क्र. २०२४/दंड/जन्म मृत्यूची नोंदणी/कावि २७६
दिनांक १२/ १२/२०२४
जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत

जन्म आणि मृत्यू ची नोंदणी सुधारणा कायदा २०२३ मधील कलम ११(३) अन्वये सर्व जनतेस मौजे जामगाव तालुका आष्टी यांना जाहीर केले जाते की अर्जदार श्री ज्ञानदेव नामदेव रणसिंग राहणार जामगाव तालुका आष्टी जिल्हा बीड यांनी त्यांचा मुलगा नामे स्वप्निल नामदेव रणसिंग याचा जन्म दिनांक ०१/०१/ २०१४ रोजी जामगाव तालुका आष्टी येथे झाला असून अर्जदारास सदर जन्मची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे करिता सदरहू अर्जदाराचे मुलाचे कायदेशीर जन्माचे दिनांक कायदेशीर नवे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकतीने दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहू अर्जदार यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक १२/ १२/ २०२४ रोजी माझी सही व शिक्यानिशी दिले.

आदेशावरुन
स्वाक्षरीत
कार्यकारी अधिकारी तथा नायब तहसीलदार,आष्टी

जिवनात यशस्वी होण्यासाठी वक्तृत्व कला महत्वाची - मा. आ. भीमराव धोंडे

आष्टी । प्रतिनिधी

जिवनात यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांच्या अंगी चांगली वक्तृत्व कला असावी असे प्रतिपादन माजी आमदार भीमराव धोंडे यांनी कडा येथे केले. कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयामध्ये बाबाजी यांचे स्मृती प्रित्यर्थ आनंदराव धोंडे आंतरमहाविद्यालयीन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा २०२४ चे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांचे कला गुणांना संधी प्राप्त होऊन त्याच्यातील नवनवीन विचारांना चालना मिळावी तसेच वक्तृत्व गुण कौशल्ये विकसित व्हावे या उद्देशाने गेल्या १३ वर्षापासून सातत्याने ही राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली जाते.

स्पर्धेसाठी अमृत महोत्सवी भारतीय संविधान,भारताचे महान सुपुत्र - पद्मविभूषण रतन टाटा व महिला सुरक्षा - चिंता व चिंतन हे विषय ठेवण्यात आले होते.

याप्रसंगी व्यासपीठावर प्रा. डॉ. आर. आर. आंधळे, शिवचरित्रकार ह.भ.प. मोहन महाराज शेलार, प्राचार्य डॉ हरिदास विधाते उपस्थित होते. परिक्षक म्हणून प्रा. डॉ. राजाराम सोनटक्के, प्रा. परदेशी, प्रा. पटेल एम. आर. उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी स्व. पंतप्रधान मनमोहनसिंग यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार भीमराव धोंडे यांनी पुढे बोलताना सांगितले की, स्पर्धेसाठी चांगले विषय ठेवले आहेत. विद्यार्थी गुणवत्ता धारक असेल तर सर्व व्यवस्थित होते. जिवनात हुशारीचा फायदा होतो. विद्यार्थ्यांनी आतापासून कष्ट करण्याची तयारी ठेवा, जिवनात यशस्वी व्हाल. परदेशात शिक्षण घेण्यासाठी शासन मोठ्या प्रमाणात शिष्यवृत्ती देते परंतु ग्रामीण भागातील

विद्यार्थी परदेशात का शिकायला जात नाहीत असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.आपल्याला मिळालेल्या संधीचा फायदा घ्या. प्रयत्न करीत रहा यश मिळते. प्रत्येक काम मन लावून करा यश मिळतेच.

आपल्या पेक्षा लहान असलेल्या जपानसारख्या देशाची प्रगती झाली आहे, चीन या देशात तयार झालेला माल जगभर जातो. धान्याच्या बाबतीत भारत देश समृद्ध आहे त्यामुळे आपल्या देशात गोरगरिबांना मोफत धान्य वाटप केले जाते तसेच त्यांनी उद्योजक रतन टाटा यांच्या जिवन कार्याची माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी स्व. आनंदराव ऊर्फ बाबाजी धोंडे यांच्या कार्याविषयी माहिती दिली. बाबाजी यांना शिक्षणाची खुप आवड होती. ग्रामीण भागातील विद्यार्थी शिकावेत यासाठी त्यांनी मा. आ. भीमराव धोंडे यांना शाळा महाविद्यालये काढण्यास सांगितले. मुंबई येथील प्रा. डॉ. आर. आर. आंधळे यांनी सांगितले की, माजी आ. भीमराव धोंडे यांनी ग्रामीण भागात शिक्षणाची गंगा आणली. ह. भ. प. मोहन महाराज शेलार यांनी सांगितले की, प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी मला महाविद्यालयात कला सादर करण्याची संधी दिल्याने मी आज राज्यात आणि राज्याबाहेर किर्तन करीत आहे. वक्ता होण्यासाठी वक्त्याला शब्दांची जुळवाजुळव करुन ते व्यवस्थित मांडता आले पाहिजेत. तो खरा वक्ता होतो. कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ.संभू वाघुले,उपप्राचार्य डॉ.बी. एस.खैरे यांच्यासह विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. शैलजा कुचेकर, प्रा.डॉ.जी.पी.बोडखे यांनी केले व उपस्थितांचे आभार उपप्राचार्य डॉ. भास्कर चव्हाण यांनी मानले.

योगेश्वरी देवी मंदिर रस्त्यावरील अडथळा दूर करून दामिनी पथक नेमा

समाजवादी पार्टीचे पोलिस अधीक्षकांना निवेदन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते गुरूवार पेठ मार्गे योगेश्वरी देवी मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर वाहनांमुळे रहदारीस अडथळा निर्माण होत आहे. तो दूर करून दामिनी पथकाची नेमणूक करा अशी मागणी समाजवादी पार्टीच्या वतीने पोलिस अधीक्षक, बीड यांना शुक्रवार, दिनांक २७ डिसेंबर रोजी दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.

समाजवादी पार्टीच्या वतीने प्रदेश सचिव ऍड.शिवाजी कांबळे यांच्या नेतृत्वाखाली पोलिस अधीक्षक, बीड यांना शुक्रवार, दिनांक २७ डिसेंबर रोजी दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते गुरूवार पेठ मार्गे योगेश्वरी देवी मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर वाहनांमुळे रहदारीस अडथळा निर्माण होत आहे. तो दूर करून ट्राफीक पोलिसांची नेमणूक करा, वाहनांची बेशिस्त पार्किंग केल्यास योग्य ती कार्यवाही करावी, ऑटो रिक्षांची कागदपत्रे तपासून शिस्त न पाळल्यास योग्य ती कार्यवाही करावी, अल्पवयीन मुले वाहन चालवताना आढळून आल्यास व वाहनांची बेशिस्त पार्किंग केल्यास दंडात्मक कार्यवाही करावी, अंबाजोगाई शहरात अनेक भागात शाळा, महाविद्यालय व ट्युशन क्लासला जाणाऱ्या मुलींना, विद्यार्थीनींना परीसरातील रोड रोमियो आणि गुंड प्रवृत्तीच्या युवकांमुळे मोठा त्रास सहन करावा लागत आहे. मुली व विद्यार्थीनींना जीव धोक्यात घालून घराबाहेर पडावे लागत

◀◀ पान ३ वर

माजलगावात सामुदायिक उपनयन संस्काराचे आयोजन; ९ मार्चला होणार कार्यक्रम

माजलगाव । प्रतिनिधी

शहरामध्ये समस्त ब्राम्हण समाजाच्या वतीने सामुदायिक उपनयन संस्काराचे आयोजन दि. ९ मार्च २०२५ ला करण्यात आले असुन समाजातील गरजु व इच्छुक पालकांनी बटुंची नोंदणी करावी असे आवाहन आयोजन समितीचे अध्यक्ष डॉ. सचिन देशमुख यांनी दिली आहे.

या सोहळ्यास समाजातील संत महंतांची उपस्थिती असणार असुन त्यांचे मार्गदर्शन व आशिर्वाद लाभणार आहेत. समाजाचे एकत्रीकरण, विचारांची देवाण - घेवाण तसेच

अनावश्यक खर्चाला फाटा देता यावा या उद्देशाने या सामुहिक उपनयन संस्काराचे आयोजन दि. ९ मार्च २०२५ रविवार रोजी माउली लॉन्स येथे करण्यात आले आहे. नुकत्याच झालेल्या समस्त ब्राम्हण समाजाच्या बैठकीत कार्यकारणी जाहिर करण्यात आली असुन समितीच्या अध्यक्षपदी डॉ. सचिन देशमुख, उपाध्यक्ष विनायक रत्नपारखी, कार्यवाह बप्पा देशमुख, सहकार्यवाह नंदु आनंदगांवकर, सचिव संदिप संदिकर, सहसचिव अमर कान्हापूरकर, कोषाध्यक्ष मुकूंद जोशी, गणेश मुळी तर प्रसिध्दी प्रमुख दत्ता महाजन तसेच विविध नियोजन समित्यांची स्थापना करण्यात आली असुन समाजातील गरजु व इच्छुक पालकांनी बटुंची नोंदणी करावी असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

याठिकाणी करा बटूंची नोंदणी

माजलगाव शहरात समस्त ब्राम्हण समाजाच्या वतीने आयोजित सामूहिक उपनयन संस्काराचे आयोजन करण्यात आले आहे. शहरात पाच ठिकाणी नाव नोंदणीची सुविधा करण्यात आली असुन सायली मेडीकल मो. ९४२१३३७७८३, देशमुख सराफ मो.९४२११६१२६८, राहुल मेडीकल मो. ९७६६२२४५९२, सेवा मेडीकल मो. ९४२२३८०८४२, जगदंबा फर्निचर मो. ९८५०८१०६३५ या ठिकाणी नोंदणी करावी असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

विद्यापीठ केंद्रीय युवक महोत्सवामध्ये गांधी महाविद्यालयाच्या बीसीए विद्यार्थ्यांचे प्रहसन सादरीकरण

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

डॉ .बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर येथे २५ डिसेंबर पासून केंद्रीय युवक महोत्सव २०२४ २५ ला शोभायात्रेने सकाळी नऊ वाजता महोत्सवात सुरुवात झाली या महोत्सवात कडा येथील गांधी महाविद्यालयाच्या बीसीएच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे या विद्यार्थ्यांनी प्रहसन कला प्रकार सादर केला आहे या प्रहसनाला प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली हे प्रहसन म्हणजे समाजाचा आरसा आहे

विद्यार्थ्यांना योग्य आधार आणि विश्वास दिला तर ते अधिक आत्मविश्वासाने यश मिळवू शकतात या प्रहसनात अथर्व जवणे कृष्णा दिगे प्रथमेश जवने संकेत

◀◀ पान ३ वर

जळगाव येथील शेतकऱ्याचा मुलगा झाला सीए परीक्षेत उत्तीर्ण

आष्टी । प्रतिनिधी

द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडिया मार्फत घेण्यात येणाऱ्या सनदी लेखापाल अर्थात सीए या परीक्षेचा निकाल नुकताच घोषित करण्यात आला आहे.यामध्ये जळगाव तालुका आष्टी येथे राम अशोक धुमाळ हा विद्यार्थी उत्तीर्ण झाला आहे.राम अशोक धुमाळ या विद्यार्थ्याने बी.कॉमची परीक्षा सिंहगड इन्स्टिट्यूट,पुणे येथून उत्तीर्ण केलेली आहे.एम.कॉम. आनंदराव धोंडे महाविद्यालय,कडा येथून पूर्ण केलेले आहे.सध्या तो स्वतंत्र सेनानी रामराव आवरगावकर विधी महाविद्यालय,बीड येथे अंतिम वर्षामध्ये कायद्याचे शिक्षण घेत आहे.राम धुमाळ हा २०१८ पासून पुणे येथे भाऊ लक्ष्मण सोबत राहून सीएची तयारी करत आहे.या परीक्षेतील सर्व टप्पे त्याने यशस्वीरित्या उत्तीर्ण केलेले आहेत.नुकत्याच घोषित झालेल्या अंतिम निकालात त्याने हे यश संपादन केले आहे.अत्यंत सामान्य शेतकरी कुटुंबातून त्यांनी हे यश मिळवलेले आहे.त्याच्या या यशाबद्दल आ.सुरेश धस,आष्टी दूध संघाचे चेअरमन शांतिनाथ भोसले,पोपट धुमाळ, यांनी अभिनंदन केले.

गंगाई- बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन

आष्टी । प्रतिनिधी

शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, आष्टीचे संस्थापक- अध्यक्ष माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या आई- वडिलांच्या स्मृतीप्रित्यर्थ मागील २० वर्षापासून येथील भगवान महाविद्यालयामध्ये गंगाई- बाबाजी महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. या महोत्सवामध्ये विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या मान्यवरांना गंगाई -बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येते. यावर्षी ३० जानेवारी २०२५ ते १ फेब्रुवारी २०२५ या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आलेला गंगाई- बाबाजी महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. या महोत्सवामध्ये महाविद्यालयीन वक्तृत्व , काव्यवाचन स्पर्धा व खुल्या लावणीनृत्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

१ फेब्रुवारी २०२५ रोजी विविध क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना गंगाई - बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

यामध्ये आदर्श माता- पिता, धार्मिक क्षेत्र, सामाजिक क्षेत्र, साहित्य क्षेत्र, कला क्षेत्र, कृषी क्षेत्र, शिक्षण क्षेत्र (प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन), क्रीडा क्षेत्र, पत्रकारिता, आदर्श ग्रामविकास अधिकारी, आदर्श तलाठी व आदर्श सरपंच या

क्षेत्रांचा समावेश आहे. या क्षेत्रापैकी कोणत्याही क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य असणाऱ्या मान्यवरांनी सोमवार दिनांक २० जानेवारी २०२५ पर्यंत आपले प्रस्ताव

◀◀ पान ३ वर

अंबाजोगाईत रोटरी क्लबने केली २४०० विद्यार्थ्यांची मोफत दंत तपासणी

८ शाळांमधे झाले दंत तपासणी शिबिर; २३ डॉक्टरांचा सहभाग

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीच्या वतीने शनिवारी सकाळी एकाचवेळी ८ शाळेमध्ये मोफत दंत तपासणी शिबिर झाले. शहरातील २३ दंत चिकित्सक डॉक्टरांनी २४०० विद्यार्थ्यांची तपासणी व औषधोपचार केले.

या शिबिराचे उद्घाटन गुरुदेव

विद्यालयात झाले. याचेळी सामाजिक कार्यकर्त्या डॉ.हर्षा काळे, रोटरीचे अध्यक्ष कल्याण काळे, सचिव धनराज सोळंकी, प्रकल्प संचालक डॉ.श्रीनिवास रेड्डी, सह संचालक डॉ.सचिन पोतदार,रोटरीचे उपाध्यक्ष अजित देशमुख,जगदीश जाजू, प्रा. संतोष मोहिते, राजेंद्र घोडके, डॉ.अनिल केंद्रे,प्रदीप झरकर,स्वप्नील परदेशी,रुपेश रामावत,राधेश्याम लोहिया,सचिन बेंबडे,गणेश राऊत,संभाजी बुर्गे,भिमसेन लोमटे,

◀◀ पान ३ वर

बिबट्याच्या हल्ल्यात जरेवाडीत वासराचा तर धोपटवाडीत गाईचा मृत्यू; शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील जरेवाडी येथील शेतकरी सोनाजी दगडू जरे यांच्या वासरावर (गोऱ्हा) दि.२६ गुरुवार रोजी व धोपटवाडी येथील शेतकरी राजेंद्र अशोक डांभे यांच्या गाईवर दि.२७ शुक्रवार रोजी बिबट्याने हल्ला करून गाय- वासराचा फडशा पाडला. सबंधित शेतकऱ्यांची गुरे चरत असताना बिबट्याने अचानक वासरू व गाईवर हल्ला केल्याने गाय व

वासरांचा मृत्यू झाला. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.बिबट्याच्या हल्ल्यामुळे पिंपळवंडी व परिसरातील गुराखी व शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.घटनेचा पशुवैद्यकीय व संबंधित विभागाने घटनास्थळी जाऊन पंचनामा करून पुढील कार्यवाहीसाठी शासनास माहिती कळविली आहे.वन विभागाच्या वतीने श्रीकांत काळे वनपरिक्षेत्र अधिकारी पाटोदा यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल अजय देवगुडे,वनरक्षक व्ही.एस.पवार, वनसेवक शहादेव पवार,पोपट पवार,

◀◀ पान ३ वर

मानवी जीवनाच्या सर्वांगीण विकासासाठी सामाजिक शास्त्राची भूमिका महत्त्वाची -प्राचार्य डॉ.विश्वास

जय भवानी महाविद्यालय सामाजिक शास्त्र मंडळाचे उद्घाटन संपन्न

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येतील जय भवानी महाविद्यालयात सामाजिक शास्त्र मंडळ विभागाच्या वतीने सामाजिक शास्त्र मंडळाचे उद्घाटन कार्यक्रम संपन्न झाल या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य प्रा सोमनाथ घाडगे सर उद्घाटन म्हणून प्राचार्य डॉ विश्वास कदम सर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा डॉ दत्ता दतगलवाड उपस्थित होते या कार्यक्रमाचे

प्रस्ताविक सामाजिक शास्त्र विभागाच्या समन्वयक डॉ कल्पना घारगे यांनी केले सामाजिक शास्त्राची भूमिका विद्यार्थ्यांना समजावून सांगितले तर उद्घाटक म्हणून बोलताना प्राचार्य डॉ विश्वासराव कदम यांनी आपल्या मनोगत व्यक्त करताना मानवी जीवनात खऱ्या अर्थाने परिवर्तन घडवण्याची भूमिका ही सामाजिक शास्त्रात माध्यमातून केली जाते मानवी जीवनात सामाजिक शास्त्राची भूमिका अत्यंत महत्त्वाचे असल्याचे मनोगत त्यांनी व्यक्त केले तर प्रमुख पाहुणे डॉ दत्ता मंगलवाड यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सध्याचे युग जरी विज्ञानाचे युग असले तरी सामाजिक शास्त्राची भूमिका स्पर्धा परीक्षेच्या मार्गदर्शनासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे स्पर्धा परीक्षेसाठी वेगवेगळ्या सामाजिक शास्त्रातून परीक्षा यशस्वी करता येता असे मनोगत व्यक्त केले विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त अभ्यास करून स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्याचे आवाहन केले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य प्रा सोमनाथ घाडगे सर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सामाजिक

◀◀ पान ३ वर

शेतमजुराचा मुलगा बनला सीए

जालना । प्रतिनिधी

भोकरदन तालुक्यातील हसनाबाद येथील शेतमजूर निर्मला व वसंता महाशब्दे यांचा मुलगा शुभम वसंता महाशब्दे याने नोव्हेंबर २०२४ मध्ये आयसीएआयने घेतलेल्या सीए अंतिम परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. अत्यंत प्रतिकुल परिस्थितीमध्ये त्याने मिळविलेल्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

घरची परिस्थिती अत्यंत बिकट असतानाही शिक्षणाची आवड असलेल्या शुभमने यशाचे शिखर गाठले आहे. शुभमच्या आई- वडिलांनी शेतात मिळेल ती मोलमजुरीचे काम करुन शुभमला पाठबळ दिले. शुभमने देखील चहा-

बिस्कीटावर दिवस काढले. १२-१२ तास अभ्यास करुन त्याने हे यश संपादन केले आहे. लहानपणापासुन सीए बनण्याचे स्वप्न शुभमने बाळगले होते. त्यासाठी त्याने प्रयत्नांची पराकाष्टा केली. परिस्थितीला दुष्णे न देता ध्येय, चिकाटी व जिद्द बागळल्यास यश मिळते, हे शुभमने दाखवून दिले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाच्या भरारी पथकाच्या कारवाईत ३१ लाखाहून अधिक रुपयाचा मुद्देमाल जप्त

पुणे । प्रतिनिधी

पुणे विभागाच्या राज्य उत्पादन शुल्क विभागीय भरारी पथकाच्यावतीने करण्यात आलेल्या कारवाईत अहिल्यानगर जिल्ह्यात जामखेड तालुक्यातील अरणगाव तसेच धाराशिव जिल्ह्यात परांडा तालुक्यातील लोणारवाडी येथे ३१ लाख २३ हजार २०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाचे विभागीय उपायुक्त सागर धोमकर यांनी दिली आहे.

विभागीय भरारी पथकाच्यावतीने अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यामधील अरणगाव गावाच्या हद्दीत श्रीगोंदा जामखेड मार्गावरील एच. पी. पेट्रोल पंपाजवळ महिंद्रा कंपनीची स्कॉर्पीओ चारचाकी वाहनामधील गोवा बनावटीचे मद्य मारुती सुझुकी कंपनीची स्विफ्ट डिझायर वाहनामध्ये भरत असताना छापा मारुन गोवा बनावटीच्या ॲडीरियल व्हिस्कीच्या ७५० मिली क्षमतेच्या एकूण ३२४ सिलबंद बाटल्यांचे २७ बॉक्स, दोन वाहनासह अंदाजे रक्कम १६ लाख ७२ हजार ७२० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन संबंधिताविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला.

या गुन्ह्याच्या अनुषंगाने पुढील तपासामध्ये धाराशिव जिल्ह्यातील परांडा तालुक्यात लोणारवाडी परिसरात भैरवनाथ मंदिराजवळ अशोक लेलॅण्ड कंपनीचा दोस्त चारचाकी वाहन व मारुती सुझुकी कंपनीची स्विफ्ट डिझायर या वाहनाससह ॲडरीयल व्हिस्कीच्या ७५० मिली क्षमतेच्या २१६ सिलबंद बाटल्यांचे १८ बॉक्स असा अंदाजे रक्कम १४ लाख ५० हजार ४८० रुपये किंमतीचा मुद्देमाल रिकव्हरी पंचनाम्याखाली जप्त करुन दोन व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला.

या प्रकरणी अहिल्यानगर जिल्ह्यातील दीपक आत्माराम खेडकर, भरत शहाजी राळेभात, मनोज दत्तात्रय रायपल्ली, दत्तात्रय गंगाधर सोनवणे, धाराशिव जिल्ह्यातील शस्त्रगुण ऊर्फ शतृन नवनाथ किर्दक व कैलास आण्णा जोगदंड यांच्या विरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलमाअंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील कार्यवाही सुरू आहे.

ही कारवाई निरीक्षक नरेंद्र थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली दुय्यम निरीक्षक विराज माने व धीरज सस्ते, प्रताप कदम, सतिश पौंधे, शशिकांत भाट, रणजीत चव्हाण, अनिल थोरात, अमोल दळवी, राहुल ताळळकर यांनी केली. अवैध दारू व्यवसाय करणाऱ्यावर अशाच प्रकारची कारवाई सुरू राहणार असून कोठेही अवैध दारू व्यवसाय सुरू असल्यास राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक ०२०-२९९११९८६ वर संपर्क साधावा, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून करण्यात आले आहे.

लवळे फाट्यावर दगडाने भरलेला डंपर घुसला मॉलमध्ये

मुळशी । प्रतिनिधी

चालकाचे नियंत्रण सुटल्याने दगडाने भरलेला भरधाव डंपर लवळे फाटा (ता. मुळशी) येथील मॉलमध्ये पलटी झाला. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, डंपरचालक जखमी झाला, तर डंपरसह काही चारचाकी वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. ही घटना शुक्रवारी (दि. २७) सकाळी साडेअकरा वाजता घडली.

पिरंगुट घाटातून पौडच्या दिशेने दगड वाहतूक करणारा डंपर (एमएच १६ बीसी ८८४१) जात होता. लवळे फाटा येथे डंपर आला असताना चालकाचे नियंत्रण सुटल्याने डंपर ऑक्सफर्ड मॉलच्या पार्किंगमध्ये जाऊन पलटी झाला. सुदैवाने या ठिकाणी कोणीही नसल्याने मोठी दुर्घटना टळली. मात्र, येथे असलेल्या काही चारचाकी वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. अपघात झाल्यानंतर बघ्यांची मोठी गर्दी झाली होती. येथे वाहतूक कोंडी देखील झाली होती. वरिष्ठ पोलिस निरीक्षक संतोष गिरीगोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस उपनिरीक्षक सचिन शिंदे, वाहतूक पोलिस राजेश गायकवाड, पोलिसमित्र प्रशांत शिंदे आदींनी घटनास्थळी तत्काळ जाऊन वाहतूक सुरळीत केली. गुन्हा दाखल करण्याचे काम रात्री उशिरापर्यंत सुरू होते.

या अपघातानंतर मुळशी तालुक्यामध्ये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अधिकार्यांच्या कारभाराविषयी सर्वसामान्य नागरिकांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या. पिरंगुट घाट हा अतिशय धोकादायक असून, त्यामध्ये काही ठिकाणी संरक्षण कठडे नाहीत; तर काही ठिकाणी बांधले आहेत ते अतिशय निकृष्ट दर्जाचे आहेत. अशा प्रकारचे अपघात यापूर्वी अनेकदा या ठिकाणी झालेले आहेत, तरीसुद्धा पिंगुट घाटातील समस्यांकडे लोकप्रतिनिधी तसेच अधिकारी दुर्लक्ष करत आहेत, असा आरोप सर्वसामान्य नागरिक करत आहेत.

सासवड येथील जुन्या भांडणाच्या कारणावरून घराची तोडफोड

सासवड । प्रतिनिधी

सासवड (ता पुरंदर) येथील पोलीस चौकीमध्ये ९/९/२०२२ रोजी भादवी कलम ३०७ प्रमाणे जुना गुन्हा दाखल असून या गुन्ह्यतील आरोपी हे सध्या येरवडा कारागृहामध्ये असून त्यातील आरोपी पुष्कर जगताप हा येरवडा कारागृहात असल्याचा मनात राग धरून आरोपी संदिप विठ्ठल खोपडे (वय ४० रा. मांगडेवाडी) किरण सुधीर गुळवे (वय ३० रा. धायरी) बाळा उर्फ महेश धनाजी जगताप (वय ३४ रा. सासवड) सागर चंद्रकांत शिंदे (वय २९ रा. कापरेवाडी ता. कर्जत जि. अहमदनगर) कुणाल बबन खोपडे (वय ३० रा. मांगडेवाडी) यांनी फिर्यादीला धमकी दिल्या प्रकरणी यांच्या विरोधात फिर्याद विक्रम विलास जगताप यांनी दिली आहे.

सासवड पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सासवड पोलीस ठाण्यात दि. ०९/०९/२०२२ रोजी सासवड पोलीस स्टेशन येथे गु.नं. ३६६/२०२२ भादवी कलम ३०७ वगैरे प्रमाणे गुन्हा दाखल केला होता. सदर गुन्हयामध्ये ओंकार फडतरे, गौरव जगताप, सागर उर्फ गणेश जगताप, पुष्कर उर्फ गोप्या जगताप, कुनाल उर्फ नन्या जगताप, कौशिक जगताप, अतुल जगताप यांना अटक करण्यात आली होती. अतुल जगताप हा जामीनावर मुक्त आहे. तसेच इतर सर्व आरोपी हे सध्या येरवडा जेल पुणे येथे आहेत. सदरची केस ही मा.न्यायालयात चालू आहे. दि. २७/

१२/२०२४ रोजी रात्री १०.०० वा.चे सुमारास चंदनटेकडी येथील राहते घरी आम्ही जेवण करून झोपी गेलो होतो. मध्यरात्री १२.५८ वा. चे सुमारास वहिणींना एका व्यक्तीचा याचा फोन आला, त्याने मयुरला फोन दया जरा महत्वाचे काम आहे असे सांगितले तेव्हा वहिणींनी फोन भाऊ मयुर याला दिला. तेव्हा त्याने फोनवर सांगितले की, तुमच्या जुण्या घरी चार ते पाच लोक आलले होते. ते तुम्हाला शोधत आहेत. मयुर आणि विकी जगताप यांना आम्ही आज खलास करणार आहे. त्याला ठार केल्याशिवाय आज आम्ही जाणार नाही. असे बोलत होते. दादा तुम्ही दरवाजा उघडू नका मी पोलीसांना घेवून येतो. असे बोलून त्याने फोन ठेवला. त्यानंतर थोडयाच वेळात म्हणजे ०१.११ वा. दरवाज्याची बेल वाजली आम्ही घरातील सर्वजण जागेच होतो. एकजण घराबाहेर शिवीगाळ करत होता. तो म्हणत होता की, ए विकी बाहेर ये तुझ्या यामुळे माझा भाचा गोप्या आज येरवडा जेलमध्ये आहे. तुला आणि तुझ्या घरच्यांना आज गोळयाच घालतो. मी पण गुन्हेगार आहे. असे बोलून घराबाहेर ठेवलेला लाईट्चा लॅम्प व खुर्चीची तोडफोड करत होता. आम्ही सर्वजण घाबरलो होतो. आमच्या घरासमोरील कॅमेरे हे माझे मोबाईलला अटॅच असल्याने मी चेक केले असता मला एकुण पाच इसम दिसले, आम्ही दरवाजा उघडत नसल्यामुळे ते तेथून निघुन गेले. काही वेळाने पोलीसांची गाडी आली. आम्ही पोलीसांना झाला प्रकार सांगितला. त्यानंतर मी व मयुर पोलीस स्टेशन येथे तक्रार देण्यासाठी आलो.

पती-पत्नीवर कुऱ्हाडीने वार; चौघांवर दौंड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

दौंड । प्रतिनिधी

लग्नास नकार देऊनही पळून जाऊन लग्न केल्याचा राग मनात धरून पती-पत्नीवर कुर्हाडीने वार करण्यात आले. याप्रकरणी चौघांवर दौंड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मळद (ता. दौंड) हद्दीतील घागरेवस्ती येथील कॅनॉलजवळ गुरुवारी (दि. २६) हा प्रकार घडला. लक्ष्मण घागरे, भानुदास घागरे, देविदास घागरे, सखाराम घागरे (सर्व रा. घागरेवस्ती, मळद) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी अर्चना अशोक खामगळ (वय ४५, रा. खामगळवाडी, ता. बारामती) यांनी फिर्याद दिली आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादीची मुलगी रश्मी घागरे घागरेवस्तीत राहते. तेथील लक्ष्मण सखाराम घागरे यांची मुलगी आरती लक्ष्मण घागरे हिच्याशी फिर्यादी यांचा मुलगा सुमीत खामगळ याची चांगली ओळख झाली होती. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले. फिर्यादीचे पती अशोक खामगळ यांनी आरती व सुमीतच्या लग्नासाठी आरतीचे वडील लक्ष्मण घागरे यांच्याकडे मागणी केली. लक्ष्मण घागरे यांनी त्यास नकार दिला. खामगळ यांनी लग्नाचा विषय सोडून दिला होता. त्यानंतर आरतीने सुमीतला फोन करून घेण्यास बोलावले. सुमीतने आरतीसोबत आळंदी येथे ३ जून रोजी लग्न केले.

या कारणावरून लक्ष्मण घागरेने रश्मीच्या घरी जाऊन, 'तुझ्या भावाने आमची मुलगी नेली. आता तुमचा सगळ्यांचा काटा काढतो,' अशी धमकी दिली. घटनेच्या दिवशी फिर्यादी आणि त्यांचे पती अशोक खामगळ हे मुलगी रश्मीला भेटण्यासाठी घोगरेवस्तीत गेले होते. मुलीला भेटून दोघेही पुन्हा गावी जाण्यासाठी दुचाकीवरून निघाले असता लक्ष्मण घागरे, भानुदास घागरे यांनी त्यांच्या दुचाकीला धडक दिली. पती-पत्नी दोघेही खाली पडले. त्या वेळी देविदास घागरे, सखाराम घागरे तिथे आले. देवीदास घागरे, लक्ष्मण घागरे, भानुदास घागरे यांच्या हातात कुर्हाडी होत्या. भानुदास घागरे याने फिर्यादी यांच्या डोक्यात व मांडीवर कुर्हाडीचा वार केला. लक्ष्मण घागरे, देविदास घागरे, सखाराम घागरे यांनी अशोक यांना कुर्हाडीने मारहाण केली. फिर्यादीची मुलगी रश्मी, जावई अनिल घागरे, सुनील घागरे, महादेव घागरे असे सर्वजण घटनास्थळी आले. त्या वेळी त्यांनाही आरोपींनी मारून टाकण्याची धमकी दिली. अशोक व अर्जना खामगळ यांच्यावर दौंड येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

वेडे लोक इतिहास घडवतात अन शिकलेले तो वाचतात-लक्ष्मणराव देवकर

विश्रांतवाडी । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी विविध मैदानी खेळ खेळताना हरण्याची भीती बाळगू नये.खेळाडू म्हणून पुन्हा जिंकण्याची तयारी तिथून करावी. तुमचा आजचा संघर्ष तुमचे उद्याचे सामर्थ्य निर्माण करतो. त्यामुळे विचार बदला म्हणजे तुमचे आयुष्य नक्की बदलेल. ध्येयासाठी अतोनात प्रयत्न करा. जगाने तुम्हाला वेडे म्हटले तरी चालेल कारण वेडे लोकच जगाने तुम्हाला वेडे म्हटले तरी चालेल कारण वेडे लोकच इतिहास घडवतात. शिकलेले लोक तो इतिहास वाचतात,असे प्रतिपादन एस.एस.स्कुलचे अध्यक्ष लक्ष्मणराव देवकर यांनी केले. तसेच देवकर यांनी उपस्थित सर्वांना रौप्य महोत्सवी वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

प्रतिकनगरमधील मोहनवाडी येथील एस. एस. इंग्लिश मीडियम स्कूलचा रौप्य महोत्सवी क्रीडा महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी देवकर बोलत होते. याप्रसंगी चार्टर्ड अकाउंटंट आर. आर. पाटील, शाळेचे अध्यक्ष लक्ष्मणराव देवकर,सचिव संदीप देवकर, शाळेच्या मुख्याध्यापिका नंदीता भादुरी, प्रसिदा रविशंकर, शिक्षक-पालक संघाचे सदस्य, स्कुलमधील शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाल्यानंतर 'मार्च पास्ट' करण्यात आले. स्कुलमधील चारही हाऊसच्या ध्वजवाहकांच्या प्रतिज्ञेनंतर विद्यार्थ्यांच्या

खेळातील विविध स्पर्धांनां सुरुवात झाली. यामध्ये कोन बॅलन्सिंग, फुटबॉल रेस, बाईक रायडिंग, रॅकेट बॉल बॅलेंसिंग, संगीत खुर्ची, लगोरी कलेक्शन, कांगारू जम्प, पझल गेम यांसारख्या वैविध्यपूर्ण खेळांबरोबर खानदेशी नृत्य कवायत, डंबल ड्रिल अशा विविध कवायतींचाही समावेश होता.

विद्यार्थ्यांच्या लेझीम प्रदर्शनाने सर्वांची मने जिंकली. क्रीडा महोत्सवाचे खास आकर्षण म्हणजे मल्लखांब. मल्लखांब व रोप मल्लखांबाच्या प्रात्यक्षिकाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. तसेच सध्याच्या युगात कराटेचे महत्व विद्यार्थ्यांनी दाखवून दिले.आभार प्रदर्शन झाल्यानंतर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संस्थेचे सचिव संदीप देवकर म्हणाले की, विद्यार्थ्यांनी मन व बुद्धी यांचा समन्वय साधला पाहिजे. त्यासाठी दररोज व्यायामाबरोबरच मैदानी खेळ खेळायला हवे. आजकाल मोबाईलच्या जमान्यात विद्यार्थी मैदानावर खेळायला जात नसल्याने त्यांना विविध शारीरिक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यासाठी पालकांनी आपल्या मुलांना विविध खेळांमध्ये भाग घेण्यास प्रवृत्त करावे. तसेच स्वसंरक्षणासाठी कराटेचे प्रशिक्षण अवश्य द्यावे,असे संस्थेचे सचिव संदीप देवकर म्हणाले.

शेड उभे करण्याचे काम करताना कामगाराचा मृत्यू , नन्हे भागातील दुर्घटना

पुणे । प्रतिनिधी

पत्र्याचे शेड उभे करण्याचे काम करताना तोल जाऊन पडल्याने कामगाराचा मृत्यू झाला. ही घटना नन्हे भागातील वरद एंटरप्रायझेस गुरुवारी दुपारी घडली. या दुर्घटनेत एक कामगार जखमी झाला. कामगारांना सुरक्षाविषयक साधने न पुरविता दुर्घटनेस जबाबदार असल्याच्या आरोपावरून ठेकेदाराविरुद्ध सिंहगड रस्ता पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

विलास बाबूराव पांचाळ (वय ६२, रा. आनंद प्रभात अपार्टमेंट, शिवणे) हा कामगार मृत्यूमुखी पडला. तर या दुर्घटनेत पाडुरंग बाबुराव काळे (वय ५८) हे जखमी झाले असून, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी ठेकेदार सुरेश अरविंद पांचाळ (वय ६३, रा. सहयोगनगर, वारजे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिस हवालदार विशाल खटावकर (वय ४२) यांनी सिंहगड रस्ता पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आरोपी ठेकेदार सुरेश पांचाळ यांचा फॅब्रिकेशनचा व्यवसाय आहे. विलास पांचाळ, पांडुरंग काळे हे त्यांच्याकडे कामाला आहेत. नन्हे भागातील वरद एंटरप्रायझेस येथे पत्र्याची शेड उभी करण्याचे काम ठेकेदार सुरेश पांचाळ यांना देण्यात आले होते. गुरुवारी दुपारी शेडचे काम ते करत होते. त्यावेळी बारा फूट उंचीवरून मंगेश पांचाळ, काळे, मंगेश विश्वकर्मा पडले. चौघांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच विलास पांचाळ यांचा मृत्यू झाला होता, अशी माहिती पोलिस उपनिरीक्षक सागर पवार यांनी दिली. उपनिरीक्षक पवार तपास करत आहेत.

अत्याचारांची प्रकरणे जलदगती न्यायालयापुढे चालवावीत-डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या सूचना

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील विसापूर किल्ल्याच्या पायथ्याशी राहणार्या पाच वर्षांच्या चिमुकलीसोबत पोलिसानेच अश्लील कृत्य केल्याचा धक्कादायक प्रकार घडला होता. तसेच, राजगुरुनगरमध्ये एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून दोन्ही सख्ख्या बहिणींना पाण्याच्या बॅरलमध्ये टाकून त्यांचा खून केल्याच्या पार्श्वभूमीवर विधानपरिषदेच्या उपसभापती तसेच शिवसेनेच्या नेत्या डॉ. नीलम गोर्हे यांनी पुणे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक पंकज देखमुख यांच्यासोबत चर्चा करून घटनांची माहिती घेतली.

राजगुरुनगरमधील घटनेसंबंधी डॉ. गोर्हे यांनी राजगुरुनगर व लगतच्या परिसरात परप्रांतियांचा लोढा वाढत असल्याकडेलक्ष केंद्रित केले. सामान्य मजुरांसोबत समाजकंटक व बेकायदेशीर धंद्यातील घटकही येत

आहेत. यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण होऊन सामाजिक शांततेस बाधा निर्माण होत आहे, अशा आरोपींना कडक शिक्षा करण्यात यावी.पुणे जिल्ह्यातील परप्रांतियांची नोंदणी करण्यात यावी. त्यांच्यावर प्राधान्याने लक्ष ठेवण्यात यावे. घटनेच्या अनुषंगाने सर्व परिस्थितीजन्य पुरावे, न्यायवैद्यकीय दस्तऐवज एकत्रित करून न्यायालयापुढे सादर करण्यात यावे. हे प्रकरण जलदगती न्यायालयापुढे चालवावे. विशेष सरकारी वकिलांची नियुक्ती प्राधान्याने करण्यात यावी. तसेच, याबाबतच्या कार्यवाहीचा अहवाल पाठविण्याच्या सूचना केल्या आहेत. कोंढवा परिसरात स्कूल बसचालकाने विद्यार्थिनीचा (दि. ११ डिसेंबर) विनयभंग केल्याप्रकरणी उपसभापती डॉ. नीलम गोर्हे यांनी पुणे पोलिसांना निर्देश दिले आहेत. शहरात महिला व लहान मुलींवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये, गुन्हेगारी प्रवृत्तीमध्ये वाढ झाली आहे. या प्रकरणात आरोपीला कठोर शिक्षा व्हावी, आरोपीला जामीन होणार नाही याची दक्षता घ्यावी, प्रकरण जलदगती न्यायालयात चालवावे, विशेष सरकारी वकिलांची नियुक्ती करण्यात यावी, अशा सूचना केल्या आहेत. शाळेतील विद्यार्थ्यांना ने- आण करणार्या वाहतूक बसबाबत शासनाने मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे, असे सुचित करण्यात आले. तसेच, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पाठवावा, असे डॉ. गोर्हे यांनी पोलिस आयुक्तांना सुचित केले आहे.

५ वर्षांखालील मुलांना मोबाईल बॅन, बोहरा समाजाच्या धर्मगुरुंचं फर्मान; पुण्यातील आई-वडिलांनाही मान्य

पुणे । प्रतिनिधी

डिजिटल इंडिया म्हणत आपण सर्वजणच मोबाईल इंटरनेटच्या जगात वावरतोय. मात्र, केवळ तरुण, वयोवृद्धच नाही, तर लहानगी मुलेही तासनतास मोबाईलवर आपला वेळ घालवताना दिसून येतात. अनेकदा, मोबाईलवर लहान मुलं नको ते बघतात आणि नको-नको ते करुन बसतात. हेच सगळं घडू नये म्हणून आपल्या घरातील सदस्यांकडून काळजी घेतली जाते. मात्र, दाऊदी बोहरा समाजाच्या (इहरीर) धर्मगुरुंनी १५ वर्षाखालील मुलांच्या हाती मोबाईल देऊ नका, असं फर्मानच काढलं आहे. या फर्मानाची सध्या समाजात आणि सोशल मीडियात चांगलीच चर्चा रंगत आहे. धर्मगुरुंनी काढलेलं हे फर्मान नेमकं काय आहे, अन् त्यांनी नेमकं काय म्हटलंय हे जाणून घेऊयात.

अन्न, वस्त्र, निवारा अन् मोबाईल. आपल्या प्रत्येकाच्याच आयुष्यातील अविभाज्य भाग बनले आहेत. त्यात लहान मुलांच्या हातातलं खेळणंही सध्याच हेच बनल्याचं दिसून येतं. जेवण करताना मोबाईल, घरी असताना मोबाईल, तसंच झोपताना देखील मोबाईलचा वापर होतो. हाच वापर टाळण्यासाठी आणि पुढच्या

पिढीला नीट वळणं लावण्यासाठी दाऊदी बोहरा समाजाच्या धर्मगुरुंनी १५ वर्षाखालील मुलांच्या हाती मोबाईल देऊ नका, असं फर्मान काढलं आहे. मुंबईत झालेल्या व्याख्यानात त्यांनी यासंदर्भात सूचना दिल्या अन् एका क्षणात सगळ्या बोहरा सामाजाने या निर्णयाचं स्वागत केलं.

या सूचना किंवा विनंती समाजातील प्रत्येकापर्यंत पोहचवण्यासाठी धर्मगुरुंच्या टीमने व्हॉट्सअप मेसेज केला, त्यात विविध सूचना केल्या. धर्मगुरुंच्या एका विनंतीवरुन थेट पालकांनी आपल्या मुलांना हे फर्मान सांगितलं. हट्टी, खोडकर आणि वारंवार मोबाईल पाहणारी मुलं, मोबाईलसाठी जिद्द करणारी मुलं, धर्मगुरुंच्या या फर्मानानंतर शांत झाली आणि त्यांनी मोबाईल वापरण्याचं बंद केल्याचं पुण्यात बोहरी आळीत राहणाऱ्या बोहरा समाजाचं कुटुंब सांगतं होते. मोबाईलने डोळे खराब होतात, स्क्रिन टाईम वाढला.. गेम्स खेळले तर हे वाईट आहे, असं धर्मगुरु म्हणाले. त्यामुळे मोबाईल वापरणं सोडलं आणि थेट मैदानी खेळात रमताना ही मुले दिसत आहेत. दारुदी बोहरा समाज हा अल्पसंख्यांक समाज आहे. धर्मगुरुंच्या आदेशाचं पालन करणारा समाज आहे. त्यामुळे धर्मगुरुंच्या या निर्णयाची अंमलबजावणी एका झटक्यात झाली. याच समाजाचा हा निर्णय येणाऱ्या पिढीला अनेक गोष्टींपासून वाचवू शकतो, असेही म्हटले जाते.

ऑस्ट्रेलिया व स्वीडनमध्येही उचललं पाऊल

मोबाईल आणि त्यासोबत आलेलं इंटरनेट नव्या युगाचं वरदान म्हणून पाहिलं गेलं. पण वापराचा अतिरेक झाला आणि हे वरदान शाप ठरायला लागलं. त्यातूनच ऑस्ट्रेलिया आणि स्वीडनसारख्या देशांनी नव्या पिढीला या शापापासून वाचवण्यासाठी पावलं उचलायचं ठरवलं. भारतात बोहरा समाजाने हा मार्ग स्वीकारलाय. इतरांकडून याचं अनूकरण व्हायचं असेल तर त्याची सुरुवात पालकांना स्वतःच्या सोशल मीडीयाच्या वापराबाबत संयम दाखवून करावी लागणार आहे.